शनिवार, 22 ऑक्टोबर 2022
⊙ किमत 5 रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - 02 ⊙ अंक -76
Title Code : MAHMAR51117

# आधुनिक केसरी

● MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● SATURDAY 22 OCTOBER 2022
adhunikkesari.com Adhunik Kesari
● YEAR-02 ● ISSUE-76 ● TITLE CODE : MAHMAR51117 ● PAGE-10 ● PRICE-5


मार्गदर्शक



मा. वसंत मुंडे सर



मा. चंदूलाल बियाणी सर

प्रायोजक

BANSAL CLASSES PRIVATE LIMITED Ideal for Scholars

प्रेरणास्थान



स्व. मोहनलालजी बियाणी (काकाजी)

आधुनिक केसरी, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ, मुंबई व आरोग्य मित्र महाराष्ट्र यांच्या संयुक्त विद्यमाने

दिवाळी पहाट...

बहारदार मराठी गझल मुशायरा

निमंत्रित गझलकार



गिरीश जोशी



राजू आठवले




ऋषभ कुलकर्णी



सोमनाथ सोनवणे

कुठे : महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, आंचल कॉम्प्लेक्स, गजानन महाराज मंदिर चौक, औरंगाबाद

कधी : 23 ऑक्टोबर 2022
वेळ : सकाळी 7 ते 9 वाजता




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

# समृद्धीचे प्रकाशपर्व

आधुनिक केसरी

एवढ्यात भूक लागल्याने घरच्यांनी त्याच्यासाठी पाठवलेले फराळाचे पदार्थ खायला त्याने सुरुवात केली. ते पदार्थ ज्या कागदात गुंडाळून पाठवले होते, तो कागद एका मासिकाचा दिवाळी अंकाचे एक पान होते. त्या पानावर पु ल देशपांडे यांचा ' माझे खाद्यजीवन ' हा लेख छापलेला होता. त्याने शेकोटीच्या प्रकाशात तो लेख वाचायला सुरुवात केली. वाचता वाचता पुलंच्या मिश्किल आणि खुमासदार लेखाने त्याच्या मनाचा ताबा घेतला. त्याचे निराशेचे विचार कुठल्या कुठे पळून गेले. पुलंनी ज्या खाद्य पदार्थांचे बहारदार वर्णन केले होते, ते पदार्थ खाण्यासाठी तरी आपण जगले महत्वाचे आहे असे त्याला वाटले. पुढे त्याने पुलंना एक पत्र लिहिले. त्या पत्रात त्याने म्हटले, ' खरं सांगतो, माझ्या मनात आत्महत्येचे विचार येत होते. पण आपला लेख वाचला आणि जगावंसं वाटलं.' एवढी शक्ती एखाद्या लेखामध्ये, पुस्तकांमध्ये असू शकते. मानवी जीवनात परिवर्तन घडवून आणण्याचे सामर्थ्य ग्रंथांमध्ये आहे. स्वामी विवेकानंद, डॉ बाबासाहेब आंबेडकर, डॉ ए पी जे अब्दुल कलाम यांच्यासारख्या कोणत्याही महामानवाचे उदाहरण घेतले तरी पुस्तकांवर त्यांचे अतोनात प्रेम होते हे आपल्याला लक्षात येईल. पुस्तकांनीच त्यांच्या जीवनात क्रांती घडवून आणली. ही माणसे कुठेही गेली तरी त्यांच्याबरोबर पुस्तके असत. ' जेथे जातो तेथे तू माझा सांगाती ' असे पुस्तकांच्या बाबत त्यांचे होते. डॉ कलाम यांचा जन्मदिवस आपण वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा करतो. त्यांच्या जीवनात पुस्तकांना अनन्यसाधारण महत्व होते. डॉ कलाम चांगल्या पुस्तकांना देवदूताची उपमा देतात. ग्रंथांबद्दल बोलताना ते म्हणतात, ' ग्रंथ सदैव माझे मित्र आहेत. गेल्या पन्नास वर्षांहून अधिक काळ मला ग्रंथांनी प्रेरणा दिली, स्वप्नं दिली. स्वप्नांमधून जीवितध्येये गवसली. ग्रंथानीच ध्येयपूर्तीसाठी आत्मविश्वास दिला आणि अपयशाच्या प्रसंगी धीर दिला. म्हणूनच माझ्या तरुण मित्रांनो, ग्रंथांशी मैत्री जोडा. ग्रंथ तुमचे उत्तम मित्र असतात.'
शांता शेळके यांचा ' सहावे सुख ' या नावाचा एक लघुनिबंध आहे. त्यात चिनी माणसांचा एक दाखला त्या देतात. **(क्रमशः)**



## आनंदी पहाट

# ध्वनी प्रदूषण टाळावे

आधुनिक केसरी

वाढत चाललेली लोकसंख्या, त्यांच्या गरजांची पूर्तता, पायाभूत सुविधांवर त्यानुषंगाने आलेला ताण, बदलती जीवनशैली ह्या सर्वांचाच परिणाम नागरीकरण आणि शहरीकरणावर कमी अधिक प्रमाणात सर्वच बाबतीत होत असल्याचे अनेक ठिकाणी दिसून येते. ही खरे तर खूप मोठी नागरी समस्या आहे, ह्या समस्येचा अत्यंत गांभीर्याने, प्राधान्याने अभ्यासपूर्वक विचार केला पाहिजे. अलीकडच्या काळांत सर्वत्र वाहत्या वाहतुकीचा अभाव असल्याचे दिसून येत आहे. स्वायत्त वाहतूक व्यवस्था हे वाहतुकीच्या समस्येचे मूळ कारण असल्याचे न समजणे हीच उणिव म्हणावी लागेल. नागरी वाहतूक व्यवस्थेचा वापर ज्या ठिकाणी योग्य तऱ्हेने होत असतो, त्या ठिकाणी खाजगी स्वयंचलित वाहने रस्त्यावर कमी येतात, परिणामी हवेचे, ध्वनीचे प्रदूषण नियंत्रित ठेवता येते. रस्त्यावरील वाहनांची संख्या वाढली कि, कर्णकर्कश हॉर्न आणि तेही गरजेशिवाय वाजवले जातात, वाहन जलद गतीने चालवण्यामुळे होणारे ध्वनी प्रदूषण, अनेकदा आकारण विशेषतः टू व्हीलर्स इकडून-तिकडून मोठमोठ्याने हॉर्न वाजवत फिरवल्या जातात. ह्याचा इतरांना त्रास होऊ शकतो ही जाणीव का बरे होत नाही? वाहतूक जेव्हा वाहती असते तेव्हा अनेकदा अशा समस्या उद्भवतच नाहीत. ह्यासाठी काय टाळायचे आणि काय पाळायचे हे समजून घेणे आवश्यक आहे.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

अभिव्यक्ती स्वातंत्र्य असूनही ह्याबाबतीत कोणीही अवाक शब्द काढू शकत नाही; अगदीच एखाद्याने काढलाच तर ह्या नेतेमंडळींसाठी तो त्यांच्या प्रतिष्ठेचा विषय बनून जातो. आनंदोत्सव साजरा करणे निश्चितच गैर नाही परंतू काळवेळ विचारांत घेणे, जनजीवन विस्कळीत न होऊ देणे तितकेच महत्वाचे असते. फटाकेबाजी करताना रस्ते आडवले जातात त्याचा पादचारी आणि वाहन चालकांना खूपच त्रास होत असतो, हे देखील विचारांत घेतले जात नाही.



आधुनिक केसरी

## म्हणूनी वारीचा | पाईक मी ||

यातनाचे भय |आम्हा काय वाटे ||
यत्नाचे दीवटे | आम्हा हाती ||१||
कठोर साधना | आम्हा ठायी वसे ||
तया कैसे पीसे | लागे सांगा? ||२||
नको मना अती | करू रे विचार ||
अंगी सदाचार | जागा ठेवी ||३||
हरिनामा संगे | झाली सोयरिक ||
म्हणूनी सोशिक | देह झाला ||४||
सारा भार साहे | विठ्ठल आमुचा ||
म्हणूनी वारीचा | पाईक मी ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## "निरुपण"


### जनावाहन



डॉ. चन्द्रहासशास्त्री
सोनपेठकर

**नका हो नका रेणुकाईला विसरू नका**
**जन्म आमुचा एवढाच पिटण्या डंका।।**
**हंसासी तारी माता मारी दंभाच्या बका**
**चळचळा दुष्ट कापती पडता हिची**
**नेत्रशलाका।।**
**संत्रस्त भक्त होता शिंपिते दयेच्या उदकां।**
**शक्तीनेच हो हिच्या कुमार वधितो**
**तारकां।।**
**भवानीमाय ही करितसे भंग संकटखडकां।**
**चंद्रहास म्हणे रेणुकेला विसरू नका।।**

## ।। दासबोध स्तवन ।।



### मंगलाचरण

आधुनिक केसरी

संपूर्ण ज्ञानसागर म्हणजे काय? तर हा दासबोध ग्रंथ आहे असं म्हणले तर वावगे होणार नाही. तुम्हाला अध्यात्माचा विचार करून जीवन जगायचे असेल तर आधी आपली बुध्दी शुध्द असणे गरजेचे आहे. जर प्रत्येका विषयी "अढी" मनात निर्माण करून जगत असाल तर ते जीवन व्यर्थ होय.सन्मार्गाची कास धरून संत महात्मे सांगतात त्याप्रमाणे आचरण ठेवणे ही तर परमार्थाची पहिली पायरी आहे.
शुध्द परमात्म स्वरूप मानवी कल्पनेच्या पलीकडे आहे. विश्व निर्माण करण्याच्या प्रसंगी मात्र ते मानवी कल्पनेच्या कक्षेत येते. त्यावेळी ज्ञान व कर्तृत्व या दोन अंगांचा विलास त्याच्या ठिकाणी अनुभवायला मिळतो. ज्ञानाला मंगलमूर्ती म्हणतात तर कर्तृत्व असेल तर त्याला शारदा म्हणतात. मंगलमुर्ती व शारदा दिसायला दोन वाटतात पण एकच आहेत असे समर्थ म्हणतात. ते कसे हे समर्थ आपल्याला विस्ताराने सांगतात. मानवीजीवनात ज्ञान आणि कर्म ,सिध्दांत आणि व्यवहार, विचार आणि आचारयांचा अविरोध उत्तमपणाचे लक्षण समजतात. समर्थ पुढे सांगतात की ज्या ज्ञानाने माणसाची वासना शुध्द होऊन त्याच्या जीवनात सत्कर्म घडत नाहीत ते खरें ज्ञान नव्हे. बघा हं मंडळी आपण रोज शुभंकरोतीच्या वेळी म्हणतो ना!
"सत्कर्म योगे वय घालवावे सर्वा मुखी मंगल बोलवावे "ते किती सार्थ आहे हे "मंगलाचरण"हा समास अभ्यासतांना लक्षात येते. ज्ञान व कर्म करत मानवी जीवन परिपूर्ण बनवावे हा संदेश आपल्याला दासबोधातुन मिळाला तो आपण आचरणात आणुया या समासाच्या सुरवातीला समर्थांनी मंगलमूर्ती, शारदा,सदगुरु या तिघांना वंदन केले आहे. ज्ञान हे संस्कृत भाषेमध्ये मांडणे आवश्यक आहे पण आपण ज्या भाषेत व्यवहार ( मातृभाषेत) करतो किंवा जन्मजात भाषेत ते ज्ञान आपल्याला सहज समजते म्हणून आपल्या बोलीभाषेत ज्ञानाला प्रगट करणे हा तर सर्वोत्तम मार्ग आहे. म्हणून तर आज भारतात व परदेशातील विद्यापीठातही अनेक भाषेमध्ये दासबोध"ग्रंथाचे भाषांतर होऊन कित्येक विद्यार्थी याचा अभ्यास करत आहेत आणि हे तर संताचे कर्तृत्व आहे. की त्याच्या शिकवणुकीचा जगातील विद्यार्थी लाभ घेत आहेत. गणेशवंदन-जो गजवदन आहे, सर्व विद्याचा अधिष्ठाता आहे. जो एकदंत आहे ज्याच्या हातात परशु त्रिशूळ, गदा चारही वेदांची संहिता आहे. जो लंबोदर आहे. ज्याचे वर्णन करण्यासाठी आपले अवघे आयुष्य खर्च केले तरी कमी आहे. विद्येच्या चांदण्याने शोभणारा असा जो चंद्र आहे त्यालाही गणपती वंदन करतो. म्हणजे गणपती हा पूर्णब्रह्म आहे तो पूर्ण चंद्र असल्याने आपल्यातल्या ज्ञानसमुद्राला भरती येते. त्याच्यापाशी सर्व कर्तृत्त असल्याने तो उगमस्थान आहे. सर्व विश्वाच्या पलीकडे श्रेष्ठ स्वरूप तोच आहे सर्वाच्या आधी आणि सर्वाच्या नंतर जसाच्या तसा दिसणारा स्वयंभू तोच आहे. तो ज्ञानमयी आणि विज्ञानमयी आहे. मुळारंभी आहे. संकटदूर करणारा आहे. ज्याला आपण सहस्त्रनामाने जपध्यान करू शकतो असा कर्ता, धर्ता व हर्ता असा हा गजानन आहे. व ऊंदीर हेत्याचे वाहन आहे. गणेशवंदन हा काही थोड्या शब्दात लिहिण्याचा विषय नाही आकाशाचा कागद व समुद्राची शाई करून लिहिले तरी ते कमी पडेल असा हा आपला सगळ्यांचा लाडका बाप्पाला शतकोटी नमन.



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

# संत जनाबाई

आधुनिक केसरी

कारण त्यांच्या मनात जनाईचे वेगळेच चित्र उभे राहिले होते. तरीही त्यांचा त्या बाईच्या सांगण्यावर विश्वास बसला नाही. ते तिथेच आशाळभूत नजरेने त्यांचे भांडण बघत उभे राहिले. त्यांनी न राहवून दुसरीला विचारले की, तूच जनी आहेस का? यावर ती हातातल्या गोवऱ्या खाली टाकून बोलती झाली, होय बाबा, मीच ती जनी. तुला काही त्रास आहे का माझा? तिच्या या उत्तराने अन् तिच्या वर्तणुकीने गोंधळून गेलेले कबीर आपली काही तरी चूक झाली असा विचार करून तिथून पाय काढता घेण्याच्या मनःस्थितीत होते.मात्र जनाईच्या होकाराने दुसऱ्या बाईला अजून बळ आले. ती कबिरांना म्हणाली, हे बघा, तुम्ही कोण हायसा मला ठाव न्हाई, पर तुमी एक काम करा. आमच्या दोघींच्या बी गोवऱ्या यात आहेत. तुमी आमच्या आमच्या गोवऱ्या निवडून वेचून द्या. तुमी एव्हढे काम करा अन् मग हिथून जावा. आता गोवऱ्या सारख्याच दिसतात. शेणाच्या, गोल आकाराच्या त्या गोवऱ्यात कुठली गोवरी कुणाची हे कसे ठरवणार याचे कोडे कबीरजींना पडले. कबीर विचारात पडलेले बघून जनाई म्हणाली, त्यात काय इतका विचार करायचा? अगदी सोप्पे काम आहे.
आता कबीरजी चकित झाले होते. सारख्या दिसणा-या शेणाच्या गोवऱ्यात कुठली गोवरी कुणाची हे ओळखता येणं अशक्य होते, मात्र जनी म्हणतेय की हे सोप्पे आहे. हे कसं काय सोपं असू शकतं किंवा तिच्याकडे या समस्येचं काय उत्तर आहे हे ऐकण्याकरता कबीरजी थोडे आतुर झाले.




त्यांची आतुरता त्यांच्या चेहऱ्यावर झळकली.कबिरांच्या चेह-यावरची उत्सुकता बघून जनाई हसून म्हणाली, अहो, महाराज हे अगदी सोपं काम आहे. सर्व गोव-या एके ठिकाणी करा. अन् त्यातल्या प्रत्येक गोवरीला कानी लावा. ज्या गोवरीतून 'विठ्ठल, विठ्ठल' आवाज येईल ती गोवरी माझी. अन् ज्यातून आवाज येणार नाही ती गोवरी हिची! जनाईच्या उत्तराने कबीरजींचा चेहरा एकदम फुलून आला. अन् त्या दुस-या बाईचा चेहरा गोरामोरा झाला. कबीरजी पुढे झाले आणि त्यांनी त्या ढिगातील दोन गोवऱ्या उचलल्या. गोवऱ्या उचलून कानी लावल्या अन् काय आश्चर्य, त्या गोवऱ्यातून 'विठ्ठल विठ्ठल' असा आवाज येत होता. आपण इथे येऊन कोणतीही चूक केली नाही. आपण एका महान कवयित्रीला भेटत आहोत. जिच्या विचारात देव वसतो आहे', हे त्यांच्या लक्षात आले. कबिरांनी साऱ्या गोवऱ्यांची वाटणी केली. त्या बाईच्या काही मोजक्याच गोवऱ्या होत्या तर बहुतांश गोवऱ्या जनाबाईच्या होत्या. जनाईच्या गोवऱ्यांच्या ढिगावर त्या बाईने आपल्या काही गोवऱ्या लावून तो ढीग आपलाच असल्याची खोटी बतावणी केली होती अन् वर जनाईला ती खोटे ठरवत होती.
गोवऱ्यांची वाटणी झाल्यावरही कबिरांच्या चेहऱ्यावर प्रश्नचिन्ह कायम होते. जनाईने त्यांच्या मनातील शंका ओळखली आणि म्हणाली, या गोव-यातून हा आवाज कसा आला याचे तुम्हाला कोडे पडलंय का? एकदम साधी गोष्ट आहे. मी या गोव-या थापताना विठ्ठलाचेच नाव घेते अन् माझ्या ध्यानी मनी पांडुरंग असतो, तोच या गोवऱ्यातसुद्धा असतो. कबीर चकित होऊन जनाबाईकडे पाहत राहिले अन् मग त्यांनी स्वतःची ओळख करून दिली. कबीरजींचा परिचय ऐकून जनाबाई त्यांना घरी घेऊन गेल्या. एकाग्रचित्ताने केलेल्या नामस्मरणातील ताकद सांगणारी ही घटना सत्य न समजता केवळ एक आख्यायिका असावी असा जरी विचार केला तरी यातील भावार्थ श्रेष्ठ आणि चिरंतन असाच आहे. भक्ती कशी करावी याचे नियम नाहीत, मात्र ती मनापासूनची असावी, ती सच्ची असली की आपल्यालादेखील ईश्वराचा सर्वत्र प्रत्यय येतो.

शनिवार, 22 ऑक्टोबर 2022
किमत 5 रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - 02 अंक -76
Title Code : MAHMAR51117

# आधुनिक केसरी

MARATHI • DAINIK • AURANGABAD (MAHARASHTRA) • SATURDAY 22 OCTOBER 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | YEAR-02 • ISSUE-76 • TITLE CODE : MAHMAR51117 • PAGE-10 • PRICE-5



## अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांची दिवाळी

माय धरणी आमुची, आभाळ हा बाप माझा.
त्यांचं लाडाचं लेकरु, नाव माझं बळीराजा.
पण माय बाप दोन्ही, एका वेळीच कोपली.
झाला जोराचा पाऊस, वाट पिकाची लागली.
नेला नाही फॅक्टरीने, दिला पेटवून ऊस.
झाल्या वाती झाडावर, गेला भिजून कापूस.
पाणी साचलं शेतात, वाया गेलं सोयाबीन.
घर लागलं गळाया, नाही बैलाला वैरण.
आला दिवाळीचा सणं, सारी नवीच फिकीर.
अशा ओल्या दुष्काळात, कुणी कुणा द्यावा धीर.
गेल्या साली लेक माझी, घरी दिवाळीला आली.
उटणं लावुन अंगाला, भावा अंगुळ घातली.
किती थाटात जाताना, केली तिची बोळवणं.
तव्हा लेकी जावयानं, केलं नुक्तीचं जेवणं.
आज पोरीला आणाया, कोण धाडावा मुराळी.
नाही पैसा तिकिटाला, कशी करावी दिवाळी.
साऱ्या नोकरदारांना, झाला कच्चून पगार.
आम्ही लाडूला महाग, कुणी देईना उधार.
नाही कुणीचं कुणाचा, सारा कामापुरता मामा.
आता फटाक्याच्या जागी, डबा वाजवू रिकामा.
नियतीच्या खेळापुढं, नाही कोणाचं चालत.
आम्ही नावाचेच राजे, सारं दुसऱ्याच्या हातात.



अशोक मिरगे.
अंबाजोगाई, जि. बीड.
9421278312.

## बाजारपेठेत लखलखाट



कोरोनामुळे दोन वर्षांपासून दिवाळी सणावर विरजण पडले होते. बाजारपेठेतही शुकशुकाट होता. यंदा अतिवृष्टीमुळे ग्रामीण भागात काही प्रमाणात दुखाचे सावट असले तरी शहरात मात्र दिवाळीची धूम आहे. औद्यागिक शहर म्हणून ओळख असलेल्या औरंगाबादेत शुक्रवारी पैठणगेट परिसरात खरेदीसाठी तुफान गर्दी झाली.

# सीमेवर राहणारे देशाचे पहारेकरी

## सीमावर्ती भागात असलेले प्रत्येक गाव भारताचे पहिले गाव : पंतप्रधान मोदी

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : पंतप्रधान नरेंद्र मोदी शुक्रवारपासून उत्तराखंडमध्ये दोन दिवसांच्या दौऱ्यावर आले आहेत. त्यांनी पहिल्या दिवशी श्री बद्रीनाथ आणि श्री केदारनाथ मंदिरांना भेट देऊन दर्शन घेतले. याशिवाय मोदींनी बद्रीनाथ येथील माना गावात रस्ता आणि रोपवे प्रकल्पांची पायाभरणीही केली. त्यानंतर जनतेला संबोधत करताना मोदी म्हणाले की, आज बाबा केदारनाथ आणि बद्रीनाथ विशाल यांचे दर्शन घेतल्यानंतर मन प्रसन्न झाले, जीवन धन्य झाले. तर, आतापासून सीमावर्ती भागात असलेले प्रत्येक गाव भारताचे पहिले गाव मानले जाईल. सीमेवर राहणारे तुमच्यासारखे सर्व सहकारी हे देशाचे सशक्त पहारेकरी आहेत, असे प्रतिपादन पंतप्रधान मोदी यांनी केले.**

### गरिबांचे दु :ख समजणारे सरकार –

पंतप्रधान म्हणाले आधुनिक कनेक्टिव्हिटी राष्ट्राच्या रक्षणाचीही हमी असते . यासाठी मागील आठ वर्षांपासून आम्ही या दिशेने एक पाठोपाठ एक पावले टाकत आहोत . भारतमाला योजनेअंतर्गत देशाच्या सीमावर्ती भागांना उत्तम आणि रुंद महामार्गांनी जोडले जात आहे . तर सागरमालाद्वारे आपल्या भारताच्या समुद्रकिनाऱ्यांची जोडणी मजबूत केली जात आहे . एक संवेदनशील सरकार, गरिबांचे दु :ख समजून घेणारे सरकार आज देशाच्या कानाकोपऱ्यातील लोक अनुभवत आहेत .

पंतप्रधान मोदी म्हणाले, माना गाव हे भारताचे शेवटचे गाव म्हणून ओळखले जाते. परंतु माझ्यासाठी सीमेवर वसलेले प्रत्येक गाव देशाचे पहिले गाव आहे. आतापासून सीमावर्ती भागात असलेले प्रत्येक गाव भारताचे पहिले गाव मानले जाईल. सीमेवर राहणारे तुमच्यासारखे सर्व सहकारी हे देशाचे सशक्त पहारेकरी आहेत. २१ शतकातील विकसीत भारताच्या निर्माणाचे दोन प्रमुख स्तंभ आहेत. पहिला आपली परंपरेवर गर्व आणि दुसरा म्हणजे विकासासाठी सर्वोतोपरी प्रयत्न. माना गावात पंतप्रधान मोदी म्हणाले की, पहिल्या ज्या भागांकडे देशाच्या सीमेचा शेवट म्हणून दुर्लक्ष केले जात होते, आम्ही तिथूनच समृद्धीचा प्रारंभ समजून काम सुरू केले आहे. या अगोदर देशाचे सर्वात शेवटचे गाव म्हणून ज्याची उपेक्षा केली जात होती, आम्ही तिथल्या लोकांच्या अपेक्षांवर लक्ष केंद्रित केले. अयोध्येत भव्य राम मंदिर तयार होत आहे, गुजरातमधील पावागढमध्ये देवी कालिकाच्या मंदिरापासून विन्ध्याचल देवीच्या कॉरिडोरपर्यंत भारत आपल्या सांस्कृतिक उन्नतीसाठी हाक देत आहे. पंतप्रधान मोदींनी म्हटले की, देशाच्या स्वातंत्र्याचे ७५ वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त मी लाल किल्यावरून एक आव्हान केले, ते आव्हान गुलामगिरीच्या मानसिकतेतून पूर्णपणे मुक्तीचे होते. कारण, स्वातंत्र्याच्या



इतक्या वर्षानंतरही आपल्या देशाला गुलामगिरीच्या मानसिकतेने असे काही जखडले आहे की विकासाचे काही कामही काहीजणांना गुन्हा वाटतो. आपल्या संस्कृतिशी निगडीत परदेशातील ठिकाणांची हे लोक प्रशंसा करताना थकत नव्हते, परंतू भारतात अशाप्रकारच्या कामाला तुच्छतेने पाहिले जात होते.

# ऑरिक सिटीला समृद्धी महामार्गाशी जोडल्यास गुंतवणुकीत होणार वाढ

## उद्योगमंत्री उदय सामंत

आधुनिक केसरी न्यूज



**औरंगाबाद :** ऑरिक सिटीमध्ये अनेक उद्योजक गुंतवणूक करण्यास इच्छूक आहेत. ऑरिक सिटीच्या जवळून जाणाऱ्या समृध्दी महामार्गाशी ऑरिक सिटीला जोडल्यास गुंवणूकीत नक्कीच वाढ होणार असल्याने संबंधित यंत्रणांनी तातडीने हे काम पूर्ण करण्याचे निर्देश उद्योग मंत्री उदय सामंत यांनी दिले. ऑरिक सिटीला उद्योगमंत्र्यांनी आज भेट देऊन येथील उद्योजक तसेच शेतकऱ्यांशी संवाद साधला. बैठकीपूर्वी जानेवारी 2023 मध्ये होणाऱ्या महा एक्स्पो बाबत मसिआच्या पदाधिकाऱ्यांसोबत जागेची पाहणी करुन नियोजनाची माहिती घेतली. यावेळी पालकमंत्री संदिपान भुमरे, कृषि मंत्री अब्दुल सत्तार, आमदार सर्वश्री हरिभाऊ बागडे, रमेश बोरनारे, प्रदीप जैस्वाल, ऑरिकचेसह संचालक काकुस्ते तसेच इतर अधिकारी उपस्थित होते. उद्योगमंत्री म्हणाले की, ऑरिक सिटीमध्ये मोठ्या प्रमाणावर उद्योग सुरू आहेत आणि अनेक उद्योजक गुंतवणूक करण्यास उत्सुक आहेत. ऑरिक सिटीपासून केवळ 900 मीटरवरून जाणाऱ्या समृध्दी महामार्गाला ऑरिक सिटी जोडल्यास नक्कीच फायदा होणार आहे. यामुळे मुंबई आणि पुण्याशी कनेक्टीव्हीटी वाढून वेळेची बचत होणार असल्याने उद्योजक मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक करतील. उद्योग वाढीसाठी काही नवीन योजना सुरू करता येतील का याचाही विचार करण्यात येत आहे. ऑरिक सिटीमध्ये सौर ऊर्जा प्रकल्प बसविण्याचे नियोजन करावे, ट्रक टर्मिनल उभारावे, रहिवाशी वसाहतींमधील समस्या जाणून घ्याव्यात आणि त्या सोडविण्यासाठी देखील प्रयत्न करण्याचे निर्देश उद्योगमंत्र्यांनी दिले. यावेळी पैठण, वैजापूर तसेच करमाड परिसरातील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ क्षेत्रातील शेतकऱ्यांच्या समस्या जाणून घेतल्या. यावेळी उद्योगमंत्री म्हणाले, उद्योजक आणि अधिकारी यांच्यामध्ये समन्वय ठेवावा, इतर काही समस्या असल्यास तसा प्रस्ताव पाठवावा त्या प्रस्तावावर तातडीने कार्यवाही करण्यात येईल. तसेच जिल्ह्यातील समस्या सोडविण्यासाठी दिवाळीतनंतर मुंबईत बैठक घेणार असल्याचेही उद्योगमंत्र्यांनी सांगितले.

# नितीशकुमार भाजपच्या संपर्कात ?

आधुनिक केसरी

बिहारचे मुख्यमंत्री नितीशकुमार यांनी ९ ऑगस्टला भाजप सोबत असणाऱ्या युतीतून बाहेर पडून नवे सरकार स्थापन करण्याचा निर्णय घेतला. नितीशकुमार यांनी जदयू आणि राजद, काँग्रेस असे महागठबंधनचे सरकार बनवले. नितीशुकमार मुख्यमंत्री तर तेजस्वी यादव उपमुख्यमंत्री बनले आहेत. नितीशकुमार यांनी त्यानंतर देशभरातील भाजप विरोधी पक्षांच्या नेत्यांशी संवाद साधला आहे. देशातील विरोधी पक्षांना भाजप विरोधात २०२४ च्या लोकसभा निवडणुकीसाठी एकत्रित आणण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे नितीशकुमार यांनी म्हटले. बिहारच्या मुख्यमंत्र्यांचे आणखी एक वक्तव्य चर्चेत होते ते म्हणजे भविष्यात भाजपसोबत कधीच जाणार नाही. मात्र, एकेकाळी जदयूमध्ये काम केलेले आणि नंतर पक्षातून बाहेर जावे लागलेले राजकीय रणनीतीकार प्रशांत किशोर यांनी मोठा गौप्यस्फोट केला आहे. नितीशकुमार यांनी अजून भाजपसोबत राज्यसभा उपाध्यक्ष हरिवंश यांच्या माध्यमातून संपर्क ठेवल्याचा आरोप प्रशांत किशोर यांनी केला आहे. नितीशकुमार १७ वर्षांच्या सत्तेच्या काळात १४ वर्ष भाजपसोबत राहिले आहेत. काही महिन्यांपूर्वी त्यांनी भाजपची साथ सोडून महागठबंधनचे सरकार बनवलं आहे. देशातील काही लोकांना नितीशकुमार भाजपविरोधात एक मोठी आघाडी बनवण्याच्या तयारीत आहेत, असे वाटते. मात्र, नितीशकुमार यांनी अजूनही भाजपसोबतचे चर्चेचे मार्ग बंद केलेले नाहीत याचे उदाहरण म्हणजे राज्यसभा उपाध्यक्ष हरिवंश अजूनही पदावर आहेत, असा सवाल प्रशांत किशोर यांनी सांगितले. प्रशांत किशोर यांनी नितीशकुमार बिहारमध्ये महागठबंधनमध्ये असले तरी त्यांनी भाजपची संपूर्णपणे साथ सोडलेली नाही. नितीशकुमार युतीतून बाहेर आले आहेत तर हरिवंश यांनी अद्याप पद का सोडलं नाही, ते पदावर का आहेत, भाजपने त्यांना काढले नाही, असे सवाल प्रशांत किशोर यांनी केले आहेत. जदयूने हरिवंश यांना राजीनामा द्यायला सांगितले नाही किंवा त्यांच्यावर कारवाई केलेली नाही, असे प्रशांत किशोर म्हणाले. माझ्या माहितीनुसार नितीशकुमार हरिवंश यांच्या माध्यमातून भाजपसोबत संपर्क काय ठेऊन आहेत, असा दावा किशोर यांनी केला. प्रशांत किशोर यांनी एकेकाळी जदयूमध्ये महत्वाची भूमिका बजावली होती. मात्र, नितीशकुमार आणि प्रशांत किशोर यांच्यात मतभेद झाल्यानं त्यांची हकालपट्टी करण्यात आली होती. गेल्या काही दिवसांपूर्वी प्रशांत किशोर जदयूमध्ये पुन्हा प्रवेश करेल, अशा चर्चा रंगल्या होत्या. सध्याच्या राजकीय स्थितीत नेमके काय घडेल हे सांगता येत नाही.

# जगावर मंदीचे सावट



सुरेश मंत्री
संपर्क क्र. ९४०३६५०७२२

आधुनिक केसरी

**कोरोनाच्या संकटाच्या झळा संपूर्ण जगभर बसल्या आहेत. त्यातून आता जग सावरत असतानाच जागतिक मंदीचे सावट घोंगावताना दिसत आहे. एक तर बेरोजगारी प्रचंड वाढली आहे. त्यात अनेक ठिकाणी नोकर कपातीवर भर दिला जात आहे. त्यात मोठ-मोठ्या कंपन्याही मागे नाहीत. त्याचा जबर फटका सहन करण्याची वेळ लोकांवर आलेली आहे. त्यामुळे आगामी काळात मंदीचे सावट घोंगावण्याची भीती व्यक्त होत आहे. जगभरातल्या विविध देशातल्या केंद्रीय बँका वेगाने व्याजदर वाढवत आहेत. हे पाहता २०२३ मध्ये जागतिक अर्थव्यवस्था मंदीच्या खाईत जाऊ शकते. मंदीच्या भीतीने नोकरदार वर्गामधली भीती आणखीनच वाढली आहे. कारण कोरोना काळात ज्या पद्धतीने कर्मचाऱ्यांना कामावर काढून टाकण्यात आलं, पगार कमी करण्यात आले हे सगळं त्यांच्या डोक्यातून गेलेलं नाही.**

आर्थिक पॅकेजच्या नावावर प्रचंड उधळपट्टी, चीनमध्ये कोव्हिड प्रतिबंधामुळे सप्लाय चेन व्यवस्थेवर झालेला परिणाम, रशियाने युक्रेनवर केलेल्या आक्रमणामुळे पेट्रोल डिझेलच्या वाढलेल्या किमती यामुळे खाद्यान्नाच्या किमती दशकातील सर्वाधिक इतक्या झाल्या आहेत. परिणामी अमेरिकेची केंद्रीय फेडरल बँक, बँक ऑफ इंग्लंड, जपानची केंद्रीय बँक या विकसित देशांमधील शिखर बँकांनी व्याजदर वाढवण्याची तयारी केली आहे. चीनच्या केंद्रीय बँकेने व्याजदर वाढवण्याची तयारी केलेली नाही, पण या बँकेने व्याजदरातली कपात रोखली आहे. व्याजदर वाढवले तर कंपनी आणि सर्वसाधारण ग्राहक दोघांसाठी कर्ज महाग होतं. कंपन्या आपला विस्तार रोखतात. सर्वसामान्य माणूस खर्च कमी करू लागतो. यामुळे मागणी घटते आणि आर्थिक घडामोडींचा वेग मंदावतो. यामुळे अर्थव्यवस्था मंदीत लोटली जाण्याची शक्यता आहे. आर्थिक घडामोडी मंदावल्या की त्याचा सर्वाधिक फटका नोकऱ्यांना बसतो. गेल्या आठवड्यात जागतिक बँकेने एक अहवाल प्रसिद्ध केला आहे. त्यानुसार जागतिक अर्थव्यवस्थेत रिकव्हरीनंतरची सगळ्यांत मोठी घसरण झाली आहे. १९७० नंतर अशी घसरण पाहायला मिळते आहे. अमेरिका, चीन आणि युरोपीय अर्थव्यवस्था अशा जगातल्या ताकदवान अर्थव्यवस्थांमध्ये घसरण पाहायला मिळते आहे. जागतिक अर्थव्यवस्थेला थोडासा जरी धक्का बसला तरी जगाला मंदीचा सामना करायला लागू शकतो.

पतमानांकन संस्था फिच ने वर्ष २०२२ आणि २०२३ साठी अमेरिकेच्या आर्थिक वाढीचा अंदाज व्यक्त केला आहे. अमेरिकेतील महागाई आणि मध्यवर्ती बँक फेडरल रिझर्व्हकडून व्याजदरात होत असलेली वाढ अमेरिकेला १९९० सारख्या मंदी कडे ढकलत आहे, असे भाकित फिचने व्यक्त केले आहे. पुढील वर्षी अमेरिकेची अर्थव्यवस्था केवळ ०.५ टक्के वाढेल, असा अंदाज फिचच्या अर्थतज्ज्ञांनी व्यक्त केला आहे. यापूर्वी जूनमध्ये १.५ टक्के वाढीचा अंदाज व्यक्त करण्यात आला होता. अमेरिकेत मंदीची शक्यता कमी आहे, असा अंदाज फिचच्या अर्थतज्ज्ञांनी वर्तवला होता. परंतु २०२४ मध्ये बेरोजगारीचा दर सध्याच्या ३.५ टक्क्यांवरून ५.२ टक्क्यांपर्यंत वाढेल.



म्हणजे लाखो नोक-या बुडतील. मात्र, मागील दोन मंदीच्या तुलनेत ही संख्या कमी राहील, असेही फिच ने म्हटले आहे. फिचने म्हटले की, पुढील वर्षभरात घरगुती उत्पन्न आणि ग्राहक खर्चात घट होण्याची अपेक्षा आहे. यामुळे २०२३ च्या दुस-या तिमाहीत विकास दर घटेल. अमेरिकेत सप्टेंबरमध्ये अपेक्षेपेक्षा जास्त महागाई वाढली आहे. वाढत्या महागाईच्या दबावामुळे फेडरल रिझर्व्ह पुढील महिन्यात व्याजदर ०.७५ टक्क्याने वाढवू शकते. पुरवठ्यात सुधारणा आणि तेलाच्या किमती कमी होऊनही अमेरिकेतील चलनवाढ फेडरल रिझर्व्हच्या २ टक्क्यांच्या लक्ष्यापेक्षा वरच राहिली आहे. जगभरातल्या नोकरदार माणसांना नोकरी राहील की नाही याची भीती आहे. आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या अहवालानुसार कोव्हिडच्या आधी जगभरात २५ कोटी पूर्णवेळाच्या नोकऱ्या संपुष्टात आल्या होत्या. जागतिक अर्थव्यवस्थेची आता जी स्थिती आहे ते लक्षात घेता हे चित्र पुन्हा उद्‌भूव शकतं. यंदा जुलै महिन्यापर्यंत अमेरिकेत तंत्रज्ञान क्षेत्रातील ३२,००० कर्मचाऱ्यांच्या नोकऱ्या गेल्या. या कंपन्यांमध्ये मायक्रोसॉफ्ट आणि मेटासारख्या मोठ्या कंपन्यांचाही समावेश आहे. येणाऱ्या दिवसांमध्ये तंत्रज्ञान क्षेत्रात आणखी मोठ्या प्रमाणावर कपात करण्यात येणार आहे. गेल्या महिन्यातील प्राइसवॉटरकूपरहाऊसच्या अहवालानुसार जगभरातल्या ५० टक्के कंपन्या कपातीची तयारी करत आहेत. अमेरिकेतील दिग्गज टेक कंपनी मायक्रोसॉफ्टने १ हजार कर्मचा-यांना कामावरून काढून टाकले आहे. यामध्ये विविध विभागात कार्यरत कर्मचा-यांचा समावेश आहे. कंपनीने मात्र नेमके किती कर्मचारी काढले हे सांगण्यास नकार दिला. मायक्रोसॉफ्टने म्हटले की, इतर कंपन्यांप्रमाणे आम्ही आमच्या व्यावसायिक प्राधान्यांचे नियमितपणे मूल्यांकन करतो. या आधारे संरचनात्मक बदल केले जातात. भारतातदेखील महागाई नियंत्रणाचे कारण पुढे करून रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने रेपो रेटमध्ये वाढ करण्याचा सपाटा लावला आहे. मात्र, प्रत्यक्षात महागाई नियंत्रणात आलीच नाही. तथापि, कर्जदारांना भुर्दंड सहन करण्याची वेळ आली. तसेच भारतीय अर्थव्यवस्थाही सावरण्याऐवजी अधिक गर्तेत अडकत चालली आहे. त्यामुळे चिंता व्यक्त केली जात आहे.भारतात गेल्या सहा महिन्यात स्टार्टअप कंपन्यांनी ११,००० कर्मचाऱ्यांची कपात केली आहे. परिस्थिती आणखी चिघळली तर येत्या वर्षअखेरीपर्यंत ही संख्या ६०,००० पर्यंत जाऊ शकते. कपात करणाऱ्यांमध्ये ईकॉमर्स कंपन्या अग्रणी आहेत. यानंतर एडटेक स्टार्टअपचा क्रमांक लागतो. अमेरिका आणि युरोपात मंदी आली तर भारताची निर्यात कमी होईल. यामुळे टेक्सटाईल, ज्वेलरी, पेट्रोलियम प्रॉडक्ट, फार्मा, ऑटोसारख्या पारंपरिक निर्यात क्षेत्राशी निगडीत उद्योगातील नोकऱ्यांवर गदा येऊ शकते. मंदी आली तर विदेशी आणि देशांतर्गत पर्यटकांची संख्या कमी होऊ शकते. याचा थेट परिणाम हॉटेल आणि पर्यटन व्यवसायाला होऊ शकतो. या क्षेत्रात संघटित आणि असंघटित अशा दोन्ही क्षेत्रातील माणसं काम करतात. यामुळे देशातली बेरोजगारीची स्थिती आणखी चिघळू शकते. कोव्हिडनंतर भारतीय अर्थव्यवस्थेत रिकव्हरीला सुरुवात झाली आहे. पण मंदी आली तर रिकव्हरीचा वेग घटेल. यामुळे देशात रोजगार निर्माण होण्याच्या क्षमतेवर परिणाम होईल. संपूर्ण जग सध्या वाढत्या महागाईवर उतारा काढण्याच्या प्रयत्नात आहे. अमेरिका आणि युरोपात मगाहाई गेल्या चार दशकातील सर्वोच्च स्थानी पोहोचली आहे. भारतातही महागाई रिझर्व्ह बँकेने निश्चित केलेल्या पातळीच्या वर आहे. कोव्हिडनंतर मागणीत वाढ, युक्रेन-रशिया युद्धामुळे ऊर्जा, इंधन आणि खाद्यपदार्थांच्या वाढत्या किंमतींमुळे महागाईत वाढच झाली आहे. वाढत्या महागाईने जगातील बहुतांश अर्थव्यवस्थांच्या गळ्याभोवती फास आवळला आहे. जगभरातल्या बँका व्याजदर वाढवून महागाईचा फास कमी करण्याचा प्रयत्न करत आहेत. आता मंदी आली तर मोठा फटका बसेल कारण कोरोनानंतर अर्थव्यवस्था सावरलेल्या नाहीत. नीट वेग पकडलेला नाही. त्यामुळे मंदी आली तर मोठी उलथापालथ होईल.



# प्रकाशमयतेची, मांगल्याची दिवाळी

आधुनिक केसरी

**संपूर्ण वर्षभरात आपल्या भारतात प्रत्येक महिन्यात कोणता ना कोणता सण येतो. तेंव्हा जगामध्ये नंबर १ चा सणाचा देश, सणांचा राजा असे म्हटले तरी योग्य व उचित ठरेल असे मला वाटतेय. यानुसार २४ ऑक्टोंबर रोजी सोमवारी दिवाळी हा सण मोठया आनंदाने, उत्साहाने व धुमधडाक्याने साजरा होत आहे. याच एक विशेष कारण मागील दोन वर्षात कोरोना हे महासावट आपल्या भारत व राज्यभरातील जनतेवर आलेले होते. यामुळे म्हणावी तशी हशी-खुशीने दिवाळी साजरी करता आली नाही. त्यामुळे या वर्षी दिवाळी साजरी व जनता ही मोठया धुमधडाक्यात, जोश व उत्साहात साजरी करीत आहे.**

तसेच विश्व परिवर्तनाचा संस्मरणियतेचे प्रतिक म्हणजेच आजचा हा दिवाळी सण होय. सर्वात जास्त आध्यात्मिक आणि सगळयात जास्त खुशी साजरी करण्याचा एक प्रमुख कोणता तर हा दिवाळीच होय. ज्ञान प्रकाशाचा अज्ञान अंधकारावर विजय, वाईटावर विजय, गुणांचा अवगुणावर विजय यालाच खरी दिवाळी साजरी करणे असे म्हणतात. प्रत्येक घरादारामध्ये, आजुबाजूला अधिक-अधिक पणतीचे दिवे लावून, आकश वंदिल लावून घर व संपुर्ण परिसरात अधिक-अधिक झगमगाट करुन टाकण्याची खरी चढाओढ ही दिवाळीला चालु असते. पण आपणांस हे पण माहित आहे का ? आपण एक अजर, अमर, अविनाशी आत्मा आहोत हा आत्माच एक खरा दिपक आहे. दिवाळी ही कार्तिक-अमावस्यादिनी येते आणि अमावस्या अर्थात अंधकार जी अज्ञानता, विकाराची प्रतिक आहे.

सद्यस्थितीत धनिकांना पैशाचा बेसुमार खर्च करणाNया माणसाला दिवाळी म्हणजे काहीच वाटत नाही का तर त्याच्याकडे भरपूर पैसा असल्यामुळे चांगले खाणे-पिणे, उच्च प्रतिचे भरजरी कपडे वापरणे, मौजमजा करणे हे वर्षभर चालूच असते. म्हणतात ना राजाला रोजच दिवाळी म्हणून त्याची नेहमीच दिवाळी असते. त्याच्यासाठी दिवाळीला केवळ सण एवढेच महत्व असते. परंतु खरी दिवाळी साजरी करतात मध्यमवर्गीय व गरीब माणसेच का तर गरीब वर्ग, माणूस हा मेहनत, मजुरी करुन आपल्या मुला-बाळांचे व कुटूंबाचे पोट भरवत असतो. दिवाळीच्या एक महिन्या अगोदरपासून मेहनतीच्या, कष्टाच्या पैशातून काटकसर करतात. त्या घामाच्या, श्रमाच्या पैशातून मुला-मुलींसाठी नवीन कपडे, पत्नीसाठी नवी साडी विंवा कोरेकरकरीत पातळ, गोडधोड पदार्थ बनविण्यासाठी इतर सामान, बच्चे वंपनीसाठी फटाके खरेदी करतात. या सणाला तर लहान मुला-मुलींची खुशी ही गगनाला भिडलेली असते. नवे कपडे घालून, नटून-थटून मोठया समाधानाने ही आपल्या आवडीच्या बालमित्रांना दाखवत असतात.

आकाश दिवे, रंगीबेरंगी प्रकाशात न्हावून निरभ्र आकाशलाा इंद्रधनुष्य समान सप्तरंगात अर्थात विविध रंगाच्या प्रकाशात जणू काही बोलवत असतात. संपूर्ण आसमान फटाक्याच्या आवाजाने गजबजून जातो. दिवाळीचे विशेष म्हत्व म्हणून माझ्या ओठावरी एक छोटेस काव्यगीत स्पुरले ते खालील प्रमाणे.

मल्हारराव डोणगांवकर
संपर्क क्र. ९६३७९३७५७९

**किर्तन भजन म्हणत**
**नाचत गीत गात**
**साधु-संत येत से घरात**
**प्रसन्नता मांगल्यात**
**दिवाळी येई घरात**
**न्हावून निघतसे**
**महालक्ष्मी दिवाळीच्या**
**तेजोमय प्रकाशात**
**वास असे लक्ष्मीचा**
**दिवाळी दिनी घराघरात**

दिवाळी दिवशी साक्षात महालक्ष्मी प्रत्येकाच्या घरात आल्याशिवाय राहत नाही अशी भावनिक श्रध्दा आहे. या दिवशी पवित्रतेने, मांगल्याने, लक्ष्मीपूजन केले जाते. श्रध्दायुक्त व उत्कट भावना असते की, माझ्या घरात धनसंपत्ती व विद्या ही परिपूर्ण संपन्न राहो. सुख, शांती ही सदैव नांदो. दिवाळीचे दुसरे एक विशेष महत्व म्हणजे पैसा या दिवशी इतरांना देणे हे चांगले समजल्या जात नाही. का तर पैसा ही एक लक्ष्मीच असते म्हणून घरातून गेलेला पैसा हा सहजासहजी परत येत नाही विंवा त्या घरी लक्ष्मी पाणी भरत नाही असेही म्हणतात. दिवाळी प्रमाणेच ओवाळीचे महत्व अनन्य साधारण असते. दिवाळीच्या दुसNया दिवशी ओवाळी असते. घरातील लग्न झालेली मुलगी सासरहून आपलया माहेराला कितीका दूर बाहेरगावी का असेना पण या सणाला, ओवाळीला हमखास येतेच. भावाला ओवाळून त्या भरपूर आयुष्य मिळो अशी देवाकडे प्रार्थना करतात तर भाऊ ही बहिणीवर कोणतेही संकट आले तर तिच्यासाठी धावून जाईन अशी मनोकामना करतात. असे बहिणभावाचे रक्त संबंधाचे, प्रेमाचे, पवित्रेचे नाते असते. म्हणून आली आली दिवाळी, बहिण भावास ओवाळी असे म्हटले तरी वावगे वाटणार नाही.

करिता अज्ञान अंधारात भटकणाNयांना ज्ञानाच्या प्रकाशात आणणारी, सुसंस्कृतीचा जोपासणा करणारी मांगल्याची व पवित्रेची जीवन जगावयास शिकवणारी खरी दिवाळी बहिण भावास ओवाळी.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -32, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद 431 005 (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. 205, 13 वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - 2, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
TITLE CODE -MAHMAR51117, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +91 90757 16739

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
TITLE CODE -MAHMAR51117, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# शोधकाच्या गरजेतून तंत्राचा शोध!



श्रीकृष्णदास
निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**एखाद्या प्रक्रियेचे नाव सर्वनाम होणे किंवा क्रियापद होणे, ही त्या प्रक्रियेच्या लोकमान्यतेचीच खूण असते. आज जगाच्या कुठल्याही कानाकोपऱ्यात, एखाद्या दस्तऐवजाची आहे तशी प्रत काढणे, याला त्याची झेरॉक्स काढणे असेच म्हटले जाते. इतक्या लोकोपयोगी आणि लोकप्रिय तंत्राचा शोध मात्र केवळ शोधकाच्या गरजेतून लागला. चेस्टर कार्लसन नावाच्या अमेरिकेतील स्वामित्व हक्कनोंदणी कार्यालयात काम करणाऱ्या गृहस्थांना, रोज अनेक कागदांच्या प्रती तयार करायला लागायच्या. कार्लसनला संधिवात असल्याने हे काम त्यांना अतिकष्टदायक होत होते. ते कष्ट कमी करण्यासाठी काही यांत्रिक उपाय शोधावेत म्हणून ते कामाला लागले. घरच्या स्वयंपाकघरात त्यांनी प्रयोग सुरू केले आणि दि.२२ ऑक्टोबर १९३८ रोजी प्रकाशाचा वापर करून प्रती तयार करण्याचे नवीन तंत्र विकसित करण्यात यश मिळविले.**

सन १९३९ ते १९४४पर्यंत त्यांनी आयबीएम, जीई यांसारख्या विस कंपन्यांचे उंबरठे झिजवले, पण कुणालाच या यंत्रात काही दम आहे, असे वाटले नाही. अखेर सन १९४७मध्ये हॅलोईड कॉर्पोरेशन या न्यूयॉर्कमधील एका छोट्या कंपनीने यात रस दाखवला आणि या यंत्रांचे व्यावसायिक तत्त्वावर उत्पादन करायची तयारी दाखवली. कार्लसन तोपर्यंत या तंत्रज्ञानाला इलेक्ट्रोफोटोकॉपीइन्ग याच नावाने संबोधत होते. हॅलोईडला हे नाव फार लांबलचक वाटल्याने त्यांनी याला झेरोग्राफी हे नाव दिले. ग्रीक भाषेत याचा अर्थ ड्राय रायटिंग- कोरडे लिखाण असा होतो. या तंत्रावर चालणाऱ्या यंत्रांना त्यांनी झेरॉक्स यंत्रे असे नाव दिले आणि पुढे आपल्या कंपनीचे नावही झेरॉक्स कॉर्पोरेशन असे बदलले.

झेरॉक्स यंत्राची माहिती घेण्याआधी आपण जरा यामध्ये वापरले गेलेले शास्त्र आणि तंत्रज्ञान समजावून घेऊ. आपण सर्वांनीच लहानपणी कपड्यावर फुगा घासल्यावर तो कपड्याला चिकटला जाण्याची जादू अनुभवली आहे. याचे शास्त्रीय कारण स्थिर विद्युत असते, हेही शाळेत शिकल्याचे आठवत असेल. पण यात नक्की काय होते ते पाहू. फुगा कापडावर घासल्याने कापडाच्या पृष्ठभागावरील इलेक्ट्रॉन मोकळे होतात आणि फुग्याला चिकटतात. कापडावरील इलेक्ट्रॉन कमी झाल्याने तो घनभारित- पॉझिटिव्ह होतो तर फुग्यावरील इलेक्ट्रॉन वाढल्याने तो ऋणभारित- निगेटिव्ह होतो. दोन विरुद्ध भाराचे पृष्ठभाग एकमेकांसमोर आल्याने ते एकमेकांना चिकटतात. आता याचा झेरोग्राफीशी काय संबंध? तर विद्युत आणि चुंबकत्व या दोन ऊर्जांनी बनलेल्या प्रकाशामुळे कार्यान्वित होणारा प्रकाशवाहक- फोटोकण्डक्टर हा या तंत्रातील महत्त्वाचा घटक होय. जेव्हा कुठल्याही प्रकाशवाहकावर प्रकाश पडतो तेव्हा त्याचा प्रकाशित झालेला भाग विद्युतभारित होतो, हे तत्त्व या तंत्रज्ञानात वापरले गेले आहे.

यंत्रात कार्यप्रणाली अशी चालते- १) प्रभारीकरण- चार्जिंगः प्रकाशवाहक पदार्थाचा थर असलेला दंडगोल उच्च दाबाच्या स्थिर विद्युतभाराने भारित करण्यात येतो. प्रकाश पडल्यावर विद्युतवाहक बनणाऱ्या सेलेनियम नावाच्या अर्धवाहकाचा याकरता उपयोग केला जातो. २) प्रकाशात आणणे- एक्स्पोजरः प्रखर प्रकाशाचा झोत, ज्याची प्रत काढायची आहे त्या मूळ कागदावरून, प्रकाशवाहक दंडगोलावर परावर्तित करण्यात येतो. कोऱ्या भागावरून येणारा प्रकाश त्या भागातील दंडगोलाला विद्युतवाहक बनवतो आणि त्यामुळे त्यातील विद्युतभार जमिनीत जाऊन- अर्थिंग नाहीसा होतो. मूळ कागदावरील मजकूर-चित्रे असलेल्या भागावरून प्रकाश परावर्तित न झाल्याने त्या भागाला सामोरा गेलेला दंडगोलाचा भाग ऋणभारितच राहतो. यालाच स्थिर विद्युत सुप्त- लॅटेंट प्रतिमा म्हणतात. ३) प्रकटीकरण- डेव्हलॅपिंगः प्रतिमा प्रकट करण्यासाठी टोनर- कोरडी रंगीत रासायनिक पूड (शाई नव्हे) वापरतात. ही पूड घनभारित असते. ज्याप्रमाणे फुग्याच्या खेळात फुगा कापडाला चिकटतो, तशीच जेव्हा ही पूड दंडगोलाच्या संपर्कात येते, तेव्हा दंडगोलाच्या ऋणभारित भागावर चिकटते. ४) हस्तांतरण- ट्रान्सफरः दंडगोलावरील ऋणभारापेक्षा जास्त ऋणभार दिलेला कागद जेव्हा दंडगोलाच्या संपर्कात येतो, तेव्हा दंडगोलावर चिकटलेली पूड कागदावर चिकटते आणि या कागदावर मूळ कागदाची हुबेहूब प्रतिमा तयार होते. ५) वितळणे- फ्युजिंगः प्रतिमा उमटलेला कागद दाब देणाऱ्या रोलरमधून पुढे पाठवताना गरम वातावरणाला सामोरा जातो त्यामुळे टोनरची पूड कागदावर वितळून घट्ट चिकटते.

प्रत काढण्याची प्रक्रियाः अ) ज्याची प्रत काढावयाची आहे, तो कागद यंत्रातील काचेवर ठेवला जातो आणि त्यावर झाकण ठेवले जाते. आ) दिव्याचा प्रखर झोत कागदावरून परावर्तित केला जातो. कागदावरील प्रतिमेनुसार कमी-जास्त प्रकाश परावर्तित होतो. जिथे कागद कोरा आहे, तिथून जास्त तर जिथे काही लिहिलेले आहे तिथून कमी किंवा अजिबात नाही. इ) मूळ कागदाची विद्युत छाया सेलेनियम या प्रकाशवाहकाचा थर दिलेल्या सरकत्या पट्टीवर पडते. आधुनिक यंत्रात दंडगोलाऐवजी पट्टा वापरतात. ई) पट्टा सरकताना ही छायाप्रतिमा आपल्याबरोबर पुढे नेतो. उ) टोनरच्या डब्याजवळून जाताना त्यातील पूड पट्टीवर पसरली जाते. ऊ) विद्युतभारित पूड पट्टीवर मूळ कागदाची प्रतिमा बनवते. ए) दुसऱ्या सरकत्या पट्टीवरून कोरा कागद सोडला जातो. या कागदाला विद्युतभारित केले जाते. ऐ) विद्युतभारित कागद पहिल्या सरकत्या पट्टीजवळून जाताना त्यावरील टोनरची पूड या कागदावर खेचली जाते आणि क्षणार्धात मूळ कागदावरील प्रतिमा कोऱ्या कागदावर उमटते. ओ) कागद पुढे दाब देणाऱ्या दोन गरम रोलरमधून सरकताना त्यावरील टोनरचे कण वितळून कागदावर कायमस्वरूपी प्रतिमा तयार करतात. औ) यंत्रातून मूळ कागदाची हुबेहूब- गरमागरम प्रत बाहेर पडते.

रंगीत प्रती छापताना हेच मूलभूत तंत्र वापरले जाते, फक्त मूळ प्रतिमेच्या छायेतील विद्युतभार वाचून त्याप्रमाणे मूळ रंगाच्या विरोधी रंगाची (लाल- सियान, हिरवा- मॅजेन्टा, निळा- पिवळा) पूड योग्य त्या प्रमाणात पट्टीवर सोडली जाते आणि रंगीत प्रकाशचित्र प्रत यंत्रातून बाहेर पडते. ही यंत्रे डिजिटल तंत्र वापरून चालवता यायला लागल्यापासून मूळ प्रतिमा यंत्रात स्मृतीमध्ये साठवली जाते आणि लेसर तंत्राने छापली जाते किंवा प्रत काढली जाते. आता तर संगणक तंत्र अधिक प्रगत झाल्यामुळे कुठलाही कागद वा प्रतिमा सांख्यिकी- डिजिटल तंत्राने संगणकात साठवता येतात आणि त्याच स्वरूपात कुठेही पाठवता येतात. त्यामुळे भविष्यकाळात झेरॉक्स यंत्र असेल की नाही, हा प्रश्नच आहे!

!! झेरॉक्स मशिन निर्माण दिनाच्या सर्वांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

# धनत्रयोदशी



सुधीर कोर्टीकर,
संपर्क क्र. 9765553312

आधुनिक केसरी

**धनत्रयोदशीच्या निमित्ताने नवनवीन वस्त्र ..अलंकाराची खरेदी.. सुवर्ण अलंकाराची खरेदी.. रत्ने दाग दागिने खरेदी केले जातात. या दिवशी केलेली खरेदी ही शुभ असुन ..कल्याण समृद्धीकडे घेऊन जाणारी आहे असे मानलेले आहे. आयुर्वेदाचे उपासक वैद्य यांच्या मतानुसार धनत्रयोदशी हा दिवस १४ रत्नां पैकीं धन्वंतरी या आयुर्वेदाची गंगोत्री असणाऱ्या देवतेची जन्म तिथी म्हणूनही साजरा करण्याची परंपरा आपल्याकडे आहे. या दिवशी धन्वंतरीची यथासांग पूजा अर्चा केली जाते.**

शांतपणे तेवणाऱ्या दीपमालिकेच्या या मंद प्रकाशा मधून साकार होणारा दीपोत्सव म्हणजे भारतीय संस्कृतीतील एक सुंदर स्वप्न. बालपणा पासून वर्षांनुवर्षे दिवाळीचा अनुभव घेवूनही त्यातील आनंद कमी होत नाही. साऱ्यांच्याच मनास सुखावणाऱ्या दीपोत्सवाची सुरुवात होते नी असंख्य दीप घराघरांतून उजळलतात. सगळ्यांचाचा आनंद व्दिगुणित होतो..कवी मनाला बहर येतो..दिवाळीनंतर अनेक कविता आकार घेऊ लागतात. दीपोत्सवातील या अगणीत दीपमालिकेकडे पाहिल्यावर असे वाटते ..या तेवणाऱ्या दीपांच्या तेजोमय नयनांनी वसुंधरा आसमंतातील चांदण्याकडे डोळे मिचकावून पहात प्रसन्नतेने हसत तर नाही ना ...तेजपुंज सूर्यदेवतेच्या चंदनी रथचक्राखाली असंख्य तारांगणाचा चुरा होऊन त्यांच्या चमचमणाऱ्या तेजस्वी कणांची उधळण पृथ्वीतलावर या दीप मालिकेच्या रूपाने केली नसेल ना...




हे दीपमालिके तुझ्याकडे पाहिल्यावर असेही वाटून जातं.. तुझ्या या तेजात मोतीयाचा रंग आहे .. इंद्रधनुच्या सप्तरंगाचा आल्हाद आहे.. शामसुंदराचा शृंगार आहे.. तुझ्या रंगात वर्षाऋषी ऋतुची चपळता.. शरद ऋतुची मनमोहकता.. तुझ्या सुखद सहवासाने मानवी मने आनंदातात.. अंतरंगातील चंदेरी स्मृती उजळतात.. हे दीप मालिके तुझ्याकडे पाहिल्यावर असंही मनात येऊन जातं...

"जला विना मीन कसे..
सुरा विना सूर मंदिर कसे.. दीपमालिके विना दीपोत्सव कसे दीपोत्सव कसे..."

बरेच दिवस आतुरतेने वाट पाहणारी ही दिवाळी येते .मग सुखी संकल्पना साकारू लागतात. सुगंधी तेल लावून अभ्यंगस्नान. मोहक आकर्षक कपड्यांची लय लूट ..सुगंधी स्प्रे.. साज शृंगाराला आलेला बहर. पंचपक्वान्नाची मेजवानी. मनसोक्त भोजन झाल्यानंतर..तृप्त झालेल्या मनास विश्रांती. हास्य विनोदाच्या मैफिलीतून गप्पा ना आलेली वाढती रंगात सांगत. दीपावली अंकाच्या साहित्याचे वाचन. विविध खेळ. वाचन. गायन. गीत. संगीत. छान छान चित्रपटाची लय लूट. साऱ्यांचीच मनसोक्तपणे झालेली उधळण... फटाक्यांची आतषबाजी .. एक ना दोन अशा कितीतरी सुखद क्षणांनी मानवी मन भारावून जातं.. असं चाकोरीमय जीवन जगणारा सामान्य माणूस दीपोत्सवाच्या या आनंदात स्वतःला विसरून जातो.. हरवून जातो.. हेच खरं. आपल्या भारतीय संस्कृतीच्या परंपरेच्या रुढी मधून साजरे होणारे आपले दीपोत्सव ...प्रत्येकाला विलक्षण आनंददायी सुख शांती आणि समृद्धी समाधान घेऊन येणारा हा आनंदाचा सोहळा . त्याचं वर्णन करणं खचितच अवघड आहे . दीपोत्सवाचा आनंद सोहळा अनुभवयासच हवा...हो ना...

गोवत्स द्वादशीला आपल्या सुवासिनी गोवत्सधेनुचे पूजन करतात मी दीपोत्सवाचा आरंभ होतो. अश्विनवद्य त्रयोदशीलाच धनत्रयोदशी असे संबोधले जाते. त्या दिवशी दीपदान करण्याची पद्धत आपल्या हिंदू संस्कृतीत आहे. त्या दिवशी जो यमराज यांना दीपदान करील त्याला अपमृत्यू येणार नाही अशी कथा पूर्वापार सांगितलेली आहे. त्यामुळे या दिवशी अभंग स्नान करून दिप लावण्याची प्रथा प्रचलित आहे. त्या दिवशी दिव्याचे तोंड हे दक्षिणेकडे ठेवण्याची पद्धत आहे .कारण त्या दिवशी दिव्याच्या प्रकाश हा यमराज यासाठीच आहे असे मानले जाते. एरवी दिव्याचे तोंड हे दक्षिणेकडे ठेवणे हे अशुभ समजले जाते.

धनत्रयोदशीच्या निमित्ताने नवनवीन वस्त्र ..अलंकाराची खरेदी.. सुवर्ण अलंकाराची खरेदी.. रत्ने दाग दागिने खरेदी केले जातात. या दिवशी केलेली खरेदी ही शुभ असुन ..कल्याण समृद्धीकडे घेऊन जाणारी आहे असे मानलेले आहे. आयुर्वेदाचे उपासक वैद्य यांच्या मतानुसार धनत्रयोदशी हा दिवस १४ रत्नां पैकीं धन्वंतरी या आयुर्वेदाची गंगोत्री असणाऱ्या देवतेची जन्म तिथी म्हणूनही साजरा करण्याची परंपरा आपल्याकडे आहे. या दिवशी धन्वंतरीची यथासांग पूजा अर्चा केली जाते. पूजा अर्चा नैवेद्य करून मिष्टान्नाच्या भोजनानी धनत्रयोदशीचा हा दिवस साजरा केला जातो .या दिवशी तिजोरीतील दाग दागिने बाहेर काढून स्वच्छ करून त्याची पूजाही केली जाते. तसेच महाविष्णू, महालक्ष्मी, कुबेर गणेश, नागदेवता, अशा देवतांचे यथा संग पूजन करून त्यांना पायस म्हणजेच खिरीचा नैवेद्य दाखवण्याची परंपरा आपणाकडे आजही कायम आहे हे बाकी खर...

# दोन राज्यातील पक्षांची निवडणूक चिन्हे समान असू शकतात का ?



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**जर दोन पक्षांना दोन भिन्न राज्यांमध्ये राज्य पक्ष म्हणून ओळखले जाते, तर त्यांना समान निवडणूक चिन्ह असू शकते.प्रत्येक राज्य पक्षाला त्याच्या राज्यामध्ये किंवा राज्यांमध्ये त्याच्या वापरासाठी राखीव असलेल्या चिन्हाचे वाटप केले जाते. याचा अर्थ एकाच राज्यात राज्य पक्ष म्हणून मान्यता असलेल्या दोन पक्षांना समान चिन्ह असू शकत नाही.**

निवडणुका लढणाऱ्या प्रत्येक पक्षाला भारतीय निवडणूक आयोगामार्फत चिन्हांच वाटप केलं जातं. सामान्यतः प्रत्येक पक्षाचं निवडणूक चिन्ह वेगवेगळं असतं.,दोन राज्यातील पक्षांची निवडणूक चिन्ह समान असू शकते काय?

जेव्हा आपण समाजवादी पार्टी आणि तेलगु देसम पार्टीचं चिन्ह पाहतो तेव्हा दोन्ही राजकीय पक्षांचे चिन्ह एकच असल्याचे दिसुन येते. दोहोंच निवडणूक चिन्ह एकच आहे ते म्हणजे 'सायकल'! या पारश्वभूमीवर प्रश्न पडतो की दोन वेगवेगळ्या पक्षांना एकाच निवडणूक चिन्ह देता येते का? निवडणूक आयोगाला हा अधिकार आहे का? अधिकार आहे, पण केव्हा.?

निवडणूक आयोगाने समाजवादी पक्ष व तेलगू देशम पक्षाला एकच चिन्हदोन्ही पक्षांना दिल. निवडणूक आयोगाने स्वतःहून दोन्ही पक्षांच्या 'सायकल' या चिन्हाला मान्यता दिली आहे. त्यामुळे त्यांच्याकडून ना कोणता घोळ झाला आहे आणि ना ही त्यांनी काही चूक केली आहे. मणिपूर मधील मणिपूर पीपल्स पार्टी आणि केरळमधील केरळ कॉंग्रेस या दोन्ही पक्षांचे निवडणूक चिन्ह देखील 'सायकल' होते. परंतु आता दोन्ही पक्ष स्वतंत्ररित्या सक्रीय नाहीत. एवढेच नाही तर भारतातील अजून ६ राजकीय पक्ष विविध राज्यात ३ समान निवडणूक चिन्हांसह अस्तित्वात आहेत. महाराष्ट्रातील उद्धव ठाकरेंची शिवसेना आणि झारखंड मधील शिबू सोरेन यांचा झारखंड मुक्ती मोर्चा या दोन्ही पक्षांचे चिन्ह 'धनुष्यबाण' आहे.

जर दोन पक्षांना दोन भिन्न राज्यांमध्ये राज्य पक्ष म्हणून ओळखले जाते, तर त्यांना समान निवडणूक चिन्ह असू शकते. प्रत्येक राज्य पक्षाला त्याच्या राज्यामध्ये किंवा राज्यांमध्ये त्याच्या वापरासाठी राखीव असलेल्या चिन्हाचे वाटप केले जाते. याचा अर्थ एकाच राज्यात राज्य पक्ष म्हणून मान्यता असलेल्या दोन पक्षांना समान चिन्ह असू शकत नाही.

निवडणूक चिन्हे (आरक्षण आणि वाटप) (सुधारणा) आदेश, २०१७ अंतर्गत, अशी तरतूद आहे की राजकीय पक्षाचे विभाजन झाल्यानंतर कोणत्या वस्तुस्थितीचा वापर करता येईल हे ठरवण्याचा अधिकार निवडणूक आयोगाला आहे. चिन्ह. उदाहरणार्थ, समाजवादी पक्षात, निवडणूक निरीक्षकाने अखिलेश यादव गटाला




सायकल चिन्ह दिले. निवडणूक आयोग देखील चिन्ह गोठवू शकतो आणि दोन्ही तथ्ये नवीन निवडण्यास सांगू शकतो. प्रत्येक राज्य पक्षाला एक चिन्ह वाटप केले जाते जे त्याच्या वापरासाठी विशेषतः आरक्षित राज्य किंवा राज्यांमध्ये ओळखले जाते. याचा अर्थ एकाच राज्यात राज्य पक्ष म्हणून मान्यता असलेल्या दोन पक्षांना समान चिन्ह असू शकत नाही.

# दिवाळीत फुफ्फुसाची जास्त काळजी घ्या

## डॉ. सुदाम चव्हाण यांचे आवाहन

आधुनिक केसरी न्यूज

**देव्हारी :** दिवाळी म्हटली की, फटाक्यांची आतिशबाजी ही आलीच. त्याचे आकर्षण सर्वांनाच असते. मात्र, फटाके सावधपणे न फोडल्यास मोठी हानी होऊ शकते. फटाक्यांमुळे देशात दरवर्षी सुमारे पाच हजारांवर लोकांची दृष्टी जाते, तर फटाक्यांच्या आवाजामुळे कायमचे किंवा तात्पुरते बहिरेपणा येऊ शकते. दरवर्षी सुमारे पाच टक्के रुग्ण कानांच्या गंभीर समस्यांनी त्रस्त होतात. फटाक्यांच्या वायू प्रदूषणामुळे दम्यासह विविध आजारही वाढतात. त्यामुळेच फटाके फोडताना सावधान, असा इशारा डॉक्टर सुदाम चव्हाण यांनी दिला आहे. दिवाळी हा अतिशय व्यस्त आणि तणावाचा काळ असतो. स्वयंपाकघरांमध्ये सतत लगबग सुरू असते. दिवे, रोषणाई केली जाते आणि फटाक्यांची आतिश बाजी केली जाते. परंतु साजरीकरणाबरोबरच काही काळजीही घेतली पाहिजे. दिवाळीमध्ये शरीरावर कुठेतरी भाजले जाणे स्वाभाविक असते आणि ही दुखापत सौम्य ते तीव्र स्वरूपाच्या भाजण्याच्या जखमा अशी असू शकते. अचानक फुटणारे फटाके कानासाठी घातक. आवाजामुळे कानात दडे बसणे, कान दुखणे, डोके दुखणे यांपासून कानाचा पडदा फाटणे, कायमचे किंवा तात्पुरते बहिरेपण येण्यापर्यंतचे त्रास होऊ शकतात. तात्पुरते बहिरेपण आल्यास औषधोपचाराने ते काही दिवसांमध्ये पूर्ववत होऊ शकतात. मात्र, कायमस्वरूपी बहिरेपणही येऊ शकते. त्याच वेळी फटाक्यांच्या रसायनयुक्त धुरामुळे नाक, कान, घसा व फुफ्फुसांमध्ये जंतुसंसर्ग होणे, खाज सुटणे आदी समस्याही निर्माण होतात.



**फटाके फोडताना काय काळजी घ्याल?**

- फटाके फोडत असताना ते पेटवल्यावर योग्य अंतर राखा.
- जळते फटाके हातात घेऊ नका किंवा हवेत उडवू नका.
- फटाक्यांच्या आजूबाजूला लहान मुले वावरत असल्यास लक्ष ठेवणे गरजेचे.
- नेहमी पाण्याची बादली जवळ ठेवा.
- रस्त्यावर अनेक लोक फटाके उडवत असल्याने हेल्मेट घालावे.
- स्वत :च्या मनाने औषधे घेऊ नका किंवा घरात उपलब्ध

**असलेले ड्रॉप वापरू नका**

**हे प्रथमोपचार करू शकता...**

गरम तेल किंवा बाहेरचे घटक डोळ्यात जाणे अशा सौम्य त्रासाच्या बाबतीत पिण्याचे स्वच्छ पाणी मुबलक प्रमाणात डोळ्यावर मारून डोळा पूर्णपणे स्वच्छ धुवावा किंवा कपभर पाणी डोळ्याच्या जवळ ओतत राहा आणि डोळ्यांची सतत उघडझाप करा. डोळ्यात गेलेले बाहेरचे घटक काढून टाकण्यासाठी आणि योग्य औषधे समजून घेण्यासाठी नेत्रचिकित्सकांचा सल्ला घ्या

**या लक्षणांकडे दुर्लक्ष नको**

हवेतील प्रदूषणामुळे दम लागणे, छातीत टोचल्यासारखे वाटणे, घशात सूज येणे, सर्दी आणि प्रचंड शिंका येणे, जीव घाबरणे, ॲलर्जीक खोकला येणे, छातीत घरघर होणे आदी लक्षणे दिसताच, डॉक्टरांचा सल्ला घ्या. या दिवसांत अस्थमाच्या रुग्णांनी डॉक्टरांकडून तपासणी करून घेणे महत्त्वाचे ठरते. आधुनिक केसरी चे प्रतिनिधी बहादुर चव्हाण यांच्याशी बोलताना सांगितले.



# आ. फारुख शाह यांच्या हस्ते कॉंक्रीट रोडचा शुभारंभ

## गटारी नसल्याने रस्त्यावर मोठ्या प्रमाणात साचत होते पाणी; नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न झाला होता विदारक

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शहरातील प्रभाग क्रमांक 19 हा परिसर शहराच्या पूर्व दिशेला आहे. या ठिकाणी गेल्या 40 वर्षापासून महानगरपालिकेच्या वतीने मूलभूत सुविधा पुरविण्यात आलेल्या नाहीत. गटारी नसल्याने रस्त्यावर मोठ्या प्रमाणात पाणी साचते परिणामी नागरिकांचा आरोग्याचा प्रश्न अधिक विदारक झालेला आहे. परिसरातील नागरिकांनी आमदार फारुख शाह यांच्याकडे मागणी केली त्यानुसार महानगरपालिका क्षेत्रात मूलभूत सोयी सुविधांचा विकास या योजनेअंतर्गत हाजी हाशिम मॉडेल स्कुलच्या मागे शादाब नगर येथे कॉंक्रीट रोड करण्यासाठी 30 लक्ष उपलब्ध करून देण्यात आले आहे. या कामाचा शुभारंभ आमदार फारुख शाह यांच्या हस्ते करण्यात आला. शुभारंभ कार्यक्रमाच्या अध्यक्ष असलम अन्सारी होते. याप्रसंगी जिल्हाध्यक्ष नासिर पठाण, शहराध्यक्ष मुक्तार अन्सारी, नगरसेवक सईद बेग, नगरसेवक आमिर पठाण, रफिक पठाण, आसिफ शाह,निजाम सैय्यद, माजीद पठाण, शाहिद शाह, हलिम शमसुद्दीन, सउद आलम, वसिम पिंजारी, नजर खान, अफसर इंजिनियर, इब्राहीम पठाण, रफिक काझी, खालिद अन्सारी, रियाज शाह, रिझवान अन्सारी, जाकिर शेख, रशिद शाह, नूर महमद शाह, जाकिर अन्सारी, अन्वर पिंजारी, सुलतान शाह, ईसमाईल शेख, वकार बेगआदी उपस्थित होते.या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन कैसर अहमद यांनी केले. तर आभार शोएब बागवान, मलिक अंजुम, यांनी मानले. कामाचा प्रारंभ झाल्यामुळे परिसरातील नागरिकांनी आ.फारुख शाह यांचा सत्कार केला.

# ‘आभाळाएवढी ज्यांची उंची...’ पुस्तकाला वाचकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद


आधुनिक केसरी न्यूज

**मेहकर :** वाचाल तर वाचाल ,असे म्हटले जाते. यावरून वाचनाचे माणसाच्या प्रगतीसाठी, सुखासाठी आणि समाधानासाठी असलेले महत्त्व लक्षात येते. ज्येष्ठ पत्रकार, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शक, व्याख्याते व लेखक भगवान राईतकर यांच्या दसऱ्याला प्रकाशित झालेल्या ‘आभाळाएवढी ज्यांची उंची...’ या पुस्तकाला महाराष्ट्रामधून वाचकांचा उस्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. यामध्ये पुस्तक खरेदी करणाऱ्या वाचकांमध्ये तरुणांची संख्या भरपूर प्रमाणात आहे.

‘आभाळाएवढी ज्यांची उंची...’ या पुस्तकामध्ये ग्रामीण आणि शहरी भागातील प्रतिकूल परिस्थितीवर मात करून यशाची शिखरे पादाकांत करू पाहणाऱ्या प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वांच्या जीवनावर प्रकाश टाकलेला आहे. प्रत्येक वाचकांसाठी आणि विशेष तरुणांसाठी प्रेरणादायी पुस्तक म्हणून ‘ आभाळाएवढी ज्यांची उंची...’ या पुस्तकाकडे वाचक पाहत आहे. प्रतिकूल परिस्थितीवर मात करून यशाचा मार्ग कशा पद्धतीने काढता येतो ? अशा प्रकारची प्रेरणा वाचकाला या पुस्तकातून मिळत असल्यामुळे महाराष्ट्रातून वाचकवर्ग फोन पे च्या माध्यमातून पुस्तकाचे स्वागत मूल्य व पोस्टाचा खर्च पाठवून पुस्तकाची मागणी करीत आहेत. अल्पावधीमध्ये ‘आभाळाएवढी ज्यांची उंची...’ या पुस्तकाला महाराष्ट्रातील वाचकांचा मिळत असलेला प्रतिसाद हा निश्चितच कौतुकास्पद आहे. लेखकाची सरळ, सोपी आणि हृदयस्पर्शी भाषा वाचकाचे विशेष लक्ष वेधून घेत आहे.

आपणही 9730332151 या व्हाट्सअप नंबर वर मेसेज सेंड करून ‘आभाळाएवढी ज्यांची उंची...’ या प्रेरणादायी पुस्तकाची मागणी करू शकता आणि वाचनाचा आनंद घेऊ शकता.






# स्वातंत्र्य संग्रामाचा लढा व सरदार पटेलांचे कार्य भावी पिढीसमोर मांडणे गरजेचे : ज्येष्ठ पत्रकार अरुण करमरकर

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** सरदार वल्लभभाई पटेल यांची मुत्सद्देगिरी, झुंजारवृत्ती वेळ प्रसंगी कठोर निर्णय घेण्याची त्यांच्याकडे असलेली शक्ती यामुळेच शेकडो संस्थानांसह हैदराबाद संस्थान भारतीय संघराज्यात विलीन झाले आणि म्हणूनच सरदार वल्लभभाई पटेल भारताचे लोहपुरुष म्हणून ओळखले जातात. स्वातंत्र्यसंग्रामचा लढा व पटेल यांचे राष्ट्रभक्तीने प्रेरित ओतप्रोत कार्य भीवी पिढी समोर मांडणे गरजेचे आहे असे मत स्व.प्रल्हादजी अभ्यंकर स्मृती व्याख्यानमालेत ज्येष्ठ साहित्यिक व पत्रकार अरुण करमरकर यांनी व्यक्त केले. मराठवाडा युवक विकास मंडळ आयोजित प्रल्हादजी अभ्यंकर स्मृती व्याख्यानमालेस बुधवारी निराला बाजार येथील तापडिया नाट्यमंदिरात सुरुवात झाली. यात पहिले पुष्प बुधवारी करमरकर यांनी गुंफले त्यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. संजय गायकवाड तर प्रमुख पाहुणे म्हणून स्वातंत्र्यसेनानी ताराबाई लड्डा, मराठवाडा युवक विकास मंडळाचे सचिव व्यंकटेश कमळू उपस्थित होते. मराठवाडा युवक विकास



मंडळाचे सचिव व्यंकटेश कमळू व्याख्यानमालेचे प्रास्ताविक करतांना म्हणाले की,राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या विचारांनी प्रेरित अखिल भारतीय विदयार्थी परिषदेच्या पूर्व कार्यकर्त्यांचे संगठण मराठवाडा युवक मंडळाच्या वतीने आयोजित स्व.प्रल्हादजी अभ्यंकर स्मृती व्याख्यानमालेचे हे तेविसावे वर्ष आहे,मराठवाडा युवक विकास मंडळ विविध सामाजिक कार्य करत असते ,कोविड काळात देखील लसीकरण जागृती व रुग्णांना उपचारासाठी मदत करण्याचे कार्य केले आहे. असे अनेक उपक्रम मंडळ करत असते, व्याख्यानमालेचे सातत्यपूर्ण तेविसावे वर्ष ह्या वर्षी आहे. ह्या वर्षी भारतीय स्वातंत्र्याला व मराठवाडा मुक्तीसंग्रामाच्या लढ्याला ही पंच्याहत्तर वर्ष पूर्ण होत असल्याने स्वतंत्र वीरांचे स्मरण व्हावे , इतिहासातील योगदान नव्यापिढी समोर मांडल्या जावा असे विषय घेऊन ह्या वर्षीची व्याख्यानमाला होत आहे. व्याख्यानमालेच्या पहिल्या पुष्पातील प्रमुख वक्ते अरुण करमरकर यांनी एकसंघ राष्ट्र उभारणीत मराठवाडा मुक्तीसंग्रामाचे योगदान या विषयावर भाष्य केले. करमरकर म्हणाले की, देश स्वतंत्र झाला त्यावेळी फाळणीमुळे आलेल्या नागरिकांचे पुनर्वसन करणे. त्याच वेळी पेटलेल्या दंगलीमुळे कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न हाताळणे आदी जबाबदारी सरकारवर होती. त्याच सोबतच संस्थानांचे भारतात विलीनीकरण करुन घेणे हा जटील व महत्वाचा विषय होतो. सरदार पटेल गृह आणि संस्थांनीक विलीनीकरणाचे खाते सांभाळत होते. पटेल यांनी एक एक करत अनेक संस्थान भारतात विलीन करुन घेतले. परंतू हैदराबाद संस्थानाचा निजाम यास तयार नव्हता. तर दुसरीकडे हैदराबाद मुक्तीसंग्रामासाठी नागरिकांचा लढा सुरु होता. यात अनेकांनी प्राणाची आहुती दिली तर हा लढा मोडून काढण्यासाठी रझाकरांकडून अतोनत छळ सुरु होता. विविध प्रयत्न करुनही निजाम विलीनीकरणास राजी होत नसल्यानेच पटेल यांनी पोलिस कारवाईसाठी पुढाकार घेतला आणि अखेर हैदराबाद संस्थान भारतात विलीन झाले. हा सर्व इतिहास भावी पिढी समोर आणण्यासाठी साऱ्यांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे, असेही करमरकर यांनी यावेळी नमूद केले. हैद्राबाद संस्थान भौगोलिक दृष्ट्या भारताचा अंतर्गत भूभाग असल्याने, एकसंघ राष्ट्रउभारणी, हैद्राबाद संस्थान भारतीय संघराज्यात विलीन झाल्या शिवाय शक्य नव्हते. मराठवाडा मुक्तीसंग्रामाचा लढा येथील जनतेच्या निझामा विरुद्धच्या आक्रोशातून आणि सरदार पटेल यांच्या पोलीस एक्शनच्या धाडसी निर्णया मुळे यशस्वी झाला, असे प्रतिपादन वक्ते अरुण करमरकर यांनी व्याख्यानमालेत केले. यावेळी रत्नाकरराव कुलकर्णी, प्रवीण घुगे, मिलिंद पोहणेरकर, सर्जेराव ठोंबरे, मनोज शेवाळे, दिलीप थोरात, माधुरीताई अदवंत, प्रमोद राठोड, सविताताई कुलकर्णी, कचरू घोडके, डॉ.राम बुधवंत, ॲड. सुनील जाधव, निखिल आठवले, ज्ञानेश्वर जाधव प्रामुख्याने उपस्थित आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ. योगिता तौर होके पाटील यांनी तर कार्यक्रमाची सांगता तृप्ती पालोदकर यांच्या वंदे मातरमने झाली.

# विश्व बंधुत्वासाठी अध्यात्माचा पाया मजबूत व्हायला हवा

## स्वामी गोविंददेव गिरी यांचे मत; विश्वकर्मा पब्लिकेशन्सतर्फे गौरी इंदुलकर लिखित 'देवाच्या शोधात'चे प्रकाशन

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** भारत ही अध्यात्माची भूमी आहे. अध्यात्माचा प्रवाह अत्यंत मनोहारी असून, मानवी जीवनाची पूर्तता होण्यासाठी अध्यात्मिक ज्ञानाची अनुभूती घ्यायला हवी. विनाशी शरीराला अविनाशी मार्गावर घेऊन जाणाऱ्या अध्यात्माच्या मार्गावर चाललो तर जीवनाचे अंतरंग उलगडतील, असे मत अयोध्या येथील श्रीराम जन्मभूमी न्यासाचे कोषाध्यक्ष भागवत कथा निरुपणकार स्वामी गोविंददेव गिरी महाराज यांनी व्यक्त केले. विश्वबंधुत्व साकारायचे असेल, तर अध्यात्माचा पाया मजबूत करायला हवा, असेही त्यांनी नमूद केले.

विश्वकर्मा पब्लिकेशन्स प्रकाशित लेखिका गौरी इंदुलकर लिखित 'देवाच्या शोधात... माझा प्रवास' या पुस्तकाच्या प्रकाशन सोहळ्याच्या अध्यक्षस्थानावरून गोविंददेव गिरी बोलत होते. सातारा रस्त्यावरील अण्णाभाऊ साठे सभागृहात झालेल्या सोहळ्याला माजी संमेलनाध्यक्ष, ज्येष्ठ साहित्यिक डॉ. श्रीपाल सबनीस, डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाचे कुलपती डॉ. पी. डी. पाटील, अनिल इंदुलकर, विश्वकर्मा पब्लिकेशन्सचे मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल सोनी, सहसंपादक संदीप तापकीर, रवीना व अर्जुन इंदुलकर आदी उपस्थित होते.




स्वामी गोविंददेव गिरी म्हणाले, गौरी इंदुलकरांनी 'देवाच्या शोधात...' हा प्रांजळपणे मांडलेला साधनापट आहे. स्वतःचा शोध घेण्याच्या प्रवासात आलेल्या अद्‌भुत अनुभूतींचा लेखाजोखा मांडला आहे. यातील अनेक प्रसंग काहींना अंधश्रद्धा वाटतील. पण ते त्यांनी अनुभवलेले सत्य आहे. अध्यात्माला अंधश्रद्धेच्या नजरेतून पाहणारे अनेक धृतराष्ट्र पुण्यात आहेत. पण श्रद्धेचा सन्मान करणारे अनेकजण आहेत. त्यामुळे अध्यात्माला समजून घेत बाजारीकरण, भोंदूगिरीपासून आपण दूर राहायला हवे. डॉ. श्रीपाल सबनीस म्हणाले, विज्ञान विधायक व विनाशकारी स्वरूपाचे आहे. परंतु, अध्यात्म विधायक व 'वसुदेव कुटुंबकम' ही भूमिका देणारे आहे. भारताचे अध्यात्मिक चित्र आणि चरित्र वर्णन करण्याचा प्रयत्न गौरी इंदुलकर यांनी केला आहे. विज्ञानाला पडणाऱ्या प्रश्नांची उत्तरे अध्यात्मातून मिळतात. श्रद्धेशिवाय माणूस जगू शकत नाही. अध्यात्माचा धंदा करणाऱ्या ढोंगी महाराज, बुवांमुळे अध्यात्मावरचा विश्वास कमी झाला आहे. डॉ. पी. डी. पाटील म्हणाले, गौरी आणि अनिल इंदुलकर यांचा भक्तिसाधनेचा प्रवास बऱ्याच वर्षांपासून बघतो आहोत. अनुभूती आणि अनुभव याचे मिश्रण म्हणजे हे पुस्तक आहे. गुरू, ईश्वर, शास्त्र आणि स्वयम यातील स्वयम नसेल, तर इतर तीन गोष्टींचा उपयोग नाही. गुरू तुमची परीक्षा घेतात; पण हात कधी सोडत नाहीत. गुरू मिळणे भाग्याची गोष्ट असते. गुरूचा आशीर्वाद आपली कुंडलिनी जागृत व्हायला मदत करते. गौरी इंदुलकर म्हणाल्या, भगवती देवींच्या आशीर्वादाने मला ही साधना करता आली. ही साधना करताना अनेक अद्‌भुत अनुभव आले. ईश्वरी साक्षात्कार झाले. हे सगळे डायरीच्या स्वरूपात लिहून ठेवले होते. ही सगळी साधना पुस्तक रूपात उतरत आहे, याचा विलक्षण आनंद होतोय. कार्यक्रमाच्या सुरवातीला संत साहित्याचे अभ्यासक डॉ. रामचंद्र देखणे यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. विशाल सोनी यांनी स्वागत-प्रास्ताविक केले. संदीप तापकीर यांनी संपादकीय मनोगत केले. डॉ. लता पाडेकर यांनी सूत्रसंचालन केले. अनिल इंदुलकर यांनी आभार मानले.

**अध्यात्माकडे 'धृतराष्ट्राच्या नजरेने' पाहू नये**

अध्यात्माकडे अनेकजण अंधश्रद्धेच्या नजरेतून पाहतात. भगवतगीतेतील अर्जुन, हनुमान, संजय आणि धृतराष्ट्र या चार श्रोत्यांपैकी धृतराष्ट्र ज्याप्रमाणे गीता समजून घेण्याऐवजी रणांगणावर जय-पराजय कोणाचा होतोय, इतकेच पाहत असे. त्याप्रमाणे पुण्यातही अध्यात्म किंवा 'देवाच्या शोधात...' या पुस्तकाचा आशय समजून घेण्याऐवजी अंधश्रद्धेचा शिक्का मारणारे अनेक धृतराष्ट्र सापडतील. पण आपण अशा धृतराष्ट्रांकडे दुर्लक्ष करून श्रद्धापूर्वक अध्यात्म समजून घ्यावे. त्यातूनच ईश्वर आणि स्वत्वाची ओळख होणार आहे.

**- स्वामी गोविंददेव गिरी, भागवत कथा निरुपणकार**

# कॅनव्हासवरील अस्वस्थ रेघोट्याला अंकुर साहित्य संघाचा पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** माधुरी चौधरी यांच्या आयुष्याच्या कॅनव्हास वरील अस्वस्थ रेघोट्या या काव्यसंग्रहाला अंकुर साहित्य संघाचा पुरस्कार जाहीर झाला. या काव्यसंग्रहाला मिळालेला हा पाचवा राज्यस्तरीय पुरस्कार आहे. सदर पुरस्कार २९ - ३० आक्टोबरला राजश्री शाहू महाराज नाट्यमंदीर धुळे येथे होणाऱ्याा ६० व्या अंकुर साहित्य संमेलनात प्रदान करण्यात येतील.



इतर पुरस्कार पुढील प्रमाणे ऐतिहासिक-मनस्विनी (अर्चना देव), वैचारिक-विश्ववाद (सचिन कुसनाळे)' बाल साहित्य-मिठू मिठू (प्रतिभा सराफ),ललीत- गंधाळल्या स्वप्नकोशी(पल्लवी उमरे), चरित्रग्रंथ-प्रभू अजि गमला (डॉ. स्मिता निखिल दातार), कथासंग्रह-दुष्टचक्र (वृशाली नरेंद्र खैरनार)' गझलसंग्रह- किनारा (संदिप वाकोडे), काव्यसंग्रह-आयुष्याच्या कँनव्हासवरील अस्वस्थ रेघोट्या (माधुरी चौधरी), कादंबरी-धरणसुक्त (विलास शेळके),नाट्य रखेलिशी लग्न घरी आलं विघ्न (शिवाजीराव वानखडे).

# पंचनामे न करता सरसकट भरपाई द्या; तंटामुक्ती अध्यक्ष उत्तम चव्हाण

आधुनिक केसरी न्यूज



**सोयगाव :** तालुक्यात मागील अनेक दिवसांपासून जिल्ह्यासह संपूर्ण सोयगाव तालुक्यात,सावळदबारा परिसरात प्रचंड पाऊस सुरू असून परतीच्या पावसामुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. परतीच्या पावसामुळे हातातोंडाशी आलेला कापूस, सोयाबीन व मका पिकाचा शेतकऱ्यांचा घास निसर्गाने हिरावून घेतला, पिकांचे पंचनामा न करता सरसकट नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणी तंटामुक्ती अध्यक्ष उत्तम चव्हाण देव्हारी यांनी केली. अतिवृष्टीच्या संकटामुळे शेतकऱ्यांवर दयनीय परिस्थिती ओढावली आहे शेतमालाचे मोठे नुकसान झाले मराठवाड्यासह विदर्भातील शेतकऱ्यांची अवस्था बिकट झाली असून शेतकरी आत्महत्या करत आहे.तात्काळ ओला दुष्काळ जाहीर करावा. करून शेतकरी बांधवाला तात्काळ आर्थिक मदत जाहीर करण्यात यावी अशी मागणी उत्तम चव्हाण यांनी लावून धरली आहे. यावर्षी शेतकऱ्यांवर निसर्गाने संकट ओढवले आहे. विदर्भ, मराठवाड्या आणि इतर भागातह अतिवृष्टी झाली, त्यात शेतकऱ्यांनी दिससरात्र राबून पिकविलेले उभे पीके वाया गेले. सोयाबीन, कपाशी, तुर, मका, बाजारी



इत्यादी पिकांचं अतोनात नुकसान झाले आहे. फळबागा व पालेभाज्या याचेही मोठ्या प्रमाणावर या पावसाचा नुकसान झाले आहे. जोडधंदा असणाऱ्या पशुधनालाही याचा फटका बसला आहे. शेतकरी वर्गापुढे मोठं संकट उभं राहिलं आहे. खरीप हंगामात काहीतरी पदरात पडेल अशी आशा शेतकऱ्याला होती परंतु परतीच्या पावसाने सोयाबीन, कपाशी, तुर, मक्का, बाजरी इत्यादी पिकांचे अतोनात नुकसान झाले परतीच्या पावसाने शेतकऱ्यांची उरली सुरली स्वप्नही धुळीस मिसळली आहे. सरकारने शेतकऱ्यांचा अंत पाहू नये. पंचनामे न करता सरसकट ओला दुष्काळ जाहीर करुन, तात्काळ आर्थिक मदत जाहीर करावी व शेतकरी बांधवांची दिवाळी गोड करावी अशी मागणी तंटामुक्ती अध्यक्ष उत्तम चव्हाण देव्हारी ता सोयगाव यांनी तहसील कार्यालयात निवेदना द्वारे केली आहे.

# सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी; सभापती चव्हाण

आधुनिक केसरी न्यूज



**सोयगाव :** यंदा परतीच्या पावसाने औरंगाबाद जिल्ह्यात हाहाकार माजविला आहे. गत आठ दिवसांपासून सतत आणि सतत दमदार पावसाने अतोनात नुकसान सोयगाव तालुक्यात झालेले आहे. शेतकऱ्यांच्या तोंडाशी आलेला घास निसर्गाने हिरावून घेतला असला तरी शिंदे व फडणवीस सरकार आणि कृषीमंत्री अब्दुल सत्तार हे संवेदनशील सरकार असल्याने अस्मानी संकटात युतीचे शासन शेतकऱ्यांच्या यांच्या पाठीशी शेतकऱ्यांनी उभे राहावे;मा.सभापती धरमसिंग चव्हाण यांनी शेतकऱ्यांना अशी विनंती केली आहे. यांच्या पाठीशी उभे राहा हे सरकार नक्कीच शेतकऱ्यांचा फायदा करेल अशी मी ग्वाही देतो. झालेल्या नुकसानीची नुकसान भरपाईपोटी आर्थिक मदत देईल असे प्रतिपादन सोयगाव पंचायत समितीचे माजी सभापती धरमसिंग चव्हाण केले.राज्याचे कृषी मंत्री अबदुल सत्तार सोयगाव तालुक्यात या गावातील नुकसान झालेल्या शेतकऱ्यांच्या शेताच्या बांधावर जाऊन शेतकऱ्यांना दिलासा देत आहे. दि २० / १० / २०२२ रोजी कृषी मंत्री अब्दुल सत्तार यांनी गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या सततच्या पावसाने बनोटी,जरंडी, तितूर,म्हशीकोठा व सोयगाव या गावात जाऊन झालेल्या नुकसानीची पाहणी आज मतदारसंघातील सिल्लोड, सोयगाव या भागात नुकसान झालेल्या पिकांची पाहणी करून सरसगट पंचनामे करून सरसकट मदत देण्याची मागणी सुद्धा केली त्यांनी केली आहे. शेतकऱ्यांनी या सरकारच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले पाहिजेत अशे सभापती धरमसिंग चव्हाण बोलत होते.

# ऐन दिवाळीच्या तोंडावर सर्वसामान्य नागरिकांना दणका, तेलाच्या किमतीत वाढ

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** शेतकऱ्यांची दिवाळी हि फक्त दोन दिवसांवर दिवाळी सण येऊन ठेपला आहे. खुसखुशीत फराळाच्या चवीद्वारे सण साजरा करण्याची लगबग सुरू झाली आहे. मात्र, सर्वसामान्यांच्या या अपेक्षेवर महागाईमुळे पाणी फेरले जाण्याची शक्यता आहे. दिवाळी फराळासाठी वापरण्यात येणाऱ्या खाद्यतेलाच्या दरात वाढ करण्यात आली. खाद्यतेलाचे दर आठवडाभरात सरासरी १८ रुपयांनी वाढले आहेत. केंद्र सरकारने मागील काही महिन्यांत आयातशुल्कात मोठी कपात केल्यानंतरही ही दरवाढ झाली आहे. तर सर्वाधिक मागणीच्या पामतेलापेक्षा सोयाबीन तेलाची मागणी बाजारात अचानक वाढलेली दिसून येत आहे.

देशात सणासुदीचे दिवस असल्याने दिवाळीमुळे मागणी किमान २५ टक्क्यांनी वाढली आहे. मागणीच्या तुलनेत खाद्यतेलांची आवक कमी झाल्याने घाऊक बाजारात खाद्यतेलाच्या १५ किलो डब्यांच्या दरात १०० ते १५० रुपयांनी वाढ झाली आहे. महिनाभरापूर्वी हे दर स्थिर



होते. तर सूर्यफूल तेलाच्या आहे. १५ किलो डब्याच्या दरात ५०० ते ७०० रुपयांनी घट झाली होती. मात्र आता सूर्यफूल तेलाच्या डब्यामागे १५० ते २०० रुपयांनी वाढ झाली. गेल्या काही वर्षांपासून फराळाचे पदार्थ मिठाई विक्री दुकानातून खरेदी करण्याचा कल वाढला आहे. दिवाळीत खाद्यतेलांच्या मागणीत वाढ होते. मागणीच्या तुलनेत खाद्यतेलांच्या पुरवठा कमी झाल्याने घाऊक आणि किरकोळ बाजारात खाद्यतेलांच्या दरात वाढ झाली असल्याचे निरीक्षक गुजराथी यांनी नोंदविले. घाऊक बाजारात सोयाबीनच्या १५



किलो डब्यामागे १०० रुपयांनी वाढ झाली आहे. सरकी तेलाच्या दरात १०० रुपयांनी वाढ झाली असून शेंगदाणा तेलाचे दर स्थिर आहेत. पाम तेलाचे दरही वाढले आहेत. वनस्पती तुपाच्या दरात किलोमागे ५० रुपयांनी वाढ झाली परतीच्या पावसामुळे नुकसान परतीच्या पावसामुळे सोयाबीन, कापसासह सर्व शेतीमालाचे नुकसान झाले आहे. मराठवाडयात सोयाबीनची लागवड मोठया प्रमाणावर केली जाते. शेतकऱ्यांचे सोयाबीनचे नुकसान झाल्याने तेलनिर्मितीवर परिणाम होणार असल्याची राज रामराज ठाकूर(सिद्धिविनायक कृषी केंद्र) देवळगाव गुजरी यांनी बोलताना सांगितले.

# शासन योजनांच्या अंमलबजावणीस गती द्या : रावसाहेब दानवे

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** केंद्र शासनाची पंतप्रधान आवास योजना, जल जीवन मिशन, स्वच्छ भारत मिशन, उज्वला गॅस योजना, प्रधानमंत्री कौशल्य विकास योजनांच्या अंमलबजावणीस गती देऊन सर्वसामान्यांना सुविधा उपल ब्ध करुन द्याव्यात. असे निर्देश जिल्हा विकास समन्वय व नियंत्रण समितीचे (दिशा) अध्यक्ष तथा केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे यांनी आज येथे केले. औरंगाबाद जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन सभागृहात सर्व केंद्र शासनाचा योजनाचा आढावा विभागनिहाय घेण्यात आला. यावेळी केंद्रीय वित्त राज्यमंत्री डॉ. भागवत कराड, खासदार इम्तीयाज जलील, आमदार हरीभाऊ बागडे, आमदार रमेश बोरनारे, जिल्हाधिकारी आस्तिककुमार पाण्डेय, महानगरपालिका आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना यांच्यासह सर्व विभागप्रमुख या बैठकीस उपस्थित होते. प्रधानमंत्री आवास योजनेच्या अंमलबजाणीस गती देऊन, सर्वसामान्यांना घर व हक्काचा निवारा उपल्बध करुन देण्यामध्ये महानगरपलिका आणि जिल्हा प्रशासनाने तातडीने गती द्यावी. कामकाजात दिरंगाई करणाऱ्या कंत्राटदारा कडून दंड वुसल करण्या बाबत महापालिका आयुक्ताना रेल्वेमंत्री.रावसाहेब दानवे यांनी असे निर्देश दिले आहे.



# शिक्षण - काल, आज व उद्या स्पर्धेतील विजेत्यांचा सन्मान

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** न्याय देणारा परिवार या समूहात नेहमीच विचारांना नवी दिशा मिळत असते. अगदी तळागाळातील नवोदित साहित्यिकांना न्याय देण्याचे काम परिवारामार्फत केले जाते. या समुहाचे ग्रामीण भागापासून ते शहरापर्यंत सर्व स्तरातील सदस्य आहेत. म्हणजे अगदी मोलमजुरी करणाऱ्यापासून ते वर्ग-१ अधिकाऱ्यापर्यंत या समूहाचे सदस्य आहेत. ही उल्लेखनीय बाब म्हणावी लागेल.

काही दिवसांपूर्वी परिवारात समूहप्रमुख जयश्री औताडे यांच्या मार्गदर्शनाखाली 'शिक्षण - काल, आज व उद्या' ही स्तंभलेखन स्पर्धा घेतली गेली होती. स्पर्धेत महाराष्ट्रातील वेगवेगळ्या भागातून लेख आलेले होते. या स्तंभलेखाचे परिक्षण अंजली धानोरकर, (उपजिल्हाधिकारी तथा संचालक - मराठवाडा महसूल प्रबोदिनी औरंगाबाद) यांनी केले होते. त्यात प्रथम क्रमांक मनीषा संदीप बैनाडे-महेर, द्वितीय क्रमांक कावेरी आबासाहेब गायके व तृतीय क्रमांक पल्लवी राहूल पवार यांचा आलेला होता. तीन्हीही विजेत्यांना १९ ऑक्टोबर २०२२ बुधवार रोजी परीक्षक अंजली धानोरकर यांच्या हस्ते शाल, सन्मानपत्र, सन्मानचिन्ह व एक पुस्तक देऊन सन्मानित करण्यात आले. त्याप्रसंगी परिवाराच्या सदस्या तसेच ॲड. शुभांगी मोरे पाटील यांची मा. मुंबई उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठाच्या जॉईन्ट सेक्रेटरीपदी नियुक्ती झाली. त्यानिमित्ताने त्यांच्याही उपजिल्हाधिकारी अंजली धानोरकर यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

'न्याय देणारा परिवार' या समूहातातील विजेत्या सदस्यांचा उपजिल्हाधिकारी तथा संचालक – मराठवाडा महसूल प्रबोदिनी, औरंगाबाद यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. ही प्रेरणादायी बाब असून अशा सन्मानामुळे समूहातील सदस्यांना नक्कीच प्रेरणा व मिळेल.
**जयश्री उत्तरेश्वर औताडे,**
**प्रमुख – न्याय देणारा परिवार**

न्याय देणारा परिवाराच्या माध्यमातून आपली माणसं जोडून लेखणीला उत्तुंग सामर्थ्य देण्याचे कार्य लेखक बाबा चन्ने सर करत आहेत ते खरंच कौतुकास्पद आहे. त्यांच्या या निस्वार्थ कार्यामुळे भविष्यात महाराष्ट्रामध्ये सक्षम साहित्यिकांची मोठी फळी उभी राहील, हे मात्र निश्चित.
**ॲड. शुभांगी मोरे पाटील,**
**जॉईन्ट सेक्रेटरी मा. उच्च न्यायालय खंडपीठ, औरंगाबाद**

# न.प.स्वच्छता विभागाकडून बेकायदेशीर लूट सहन करणार नाही : बाबा खतीब

आधुनिक केसरी न्यूज



**अंबाजोगाई :** शहरातील नगर परिषद स्वच्छता विभागात नगर परिषद च्या मालकीची स्वतःची मैला वाहून नेणारी गाडी आहे. सदरील गाडी मागील एक ते दीड वर्षे पूर्वी घेतलेली असून ती व्यवस्थित असताना, त्या मैला गाडीला काहीही अडचण नसताना. नगर परिषद अंबाजोगाई येथील प्रशासक तथा मुख्याधिकारी स्वच्छता विभाग प्रमुख, स्वच्छता निरीक्षक सर्व मिळून संगनमताने त्या गाडीला नादुरुस्त दाखवून त्या गाडीच्या जागी अंबाजोगाई शहरातील खाजगी व्यक्तीच्या मालकीची गाडी ज्या गाडीमध्ये नगर परिषद अंबाजोगाई येथील प्रशासक तथा मुख्याधिकारी स्वच्छता विभाग प्रमुख, स्वच्छता निरीक्षक सर्व भागीदार आहेत. यांनी नवीन मैला गाडीच्या माध्यमाने शहरातील मैला वाहून नेण्याचे काम मागील ६ ते ८ महिन्यापासून हे बेकायदेशीर चालू केले आहे. या गाडीसाठी मैला वाहून नेण्यासाठी प्रती गाडी १०००० हजार ते १५००० हजार रुपये बेकायदेशीर व नियमबाह्य रक्कम आकारणी चालू केली आहे. हा सर्व प्रकार केवळ या नगर परिषद मधील संबंधित जबाबदार कर्मचारी यांनी स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी चालू केला असून यातून शहरातील नागरिकांची खूप मोठ्या प्रमाणावर आर्थिक लुट चालूं आहे या प्रकारामुळे शहराची प्रतिमा मलीन होत आहे तरी संबंधित अधिकारी, कर्मचाऱ्यांची योग्य ती चौकशी करून कायदेशीर कारवाई करण्यात यावी अशी मागणी जनतेतून होत आहे.

# चिकलठाण येथे जंगी कुस्तीची भव्य दंगल

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** तालुक्यातील चिकलठाण येथे जंगी कुस्तीची भव्य दंगल शुक्रवाद दिनांक 28/10/2022 दुपारी 2 ते 5 वाजेपर्यंत असनार आहे कुस्तीचे बक्षीस 5100 पासुन 10500 पर्यंत असणार या वेळी प्रमोद चव्हाण वस्ताद बोलताना म्हणाले की पैलवान पाहून इनाम देण्यात येईल, आखाड्यात भांडण केल्यास योग्य ती कारवाई केल्या जाईल, जीवित हानी ज्याच्या त्याच्यावर जबाबदारी राहील, कुस्ती आपसात सोडल्या जाणार नाही किंवा आपसात सुटल्यास त्याला इनाम मिळणार नाही, पंचाचा निर्णय अंतिम राहील. तालुक्यातील व इतर तालुक्यातील कुस्तीपटूंनी या कुस्तीमध्ये सहभाग नोंदवा असे आव्हान वस्ताद प्रमोद चव्हाण यांनी केले आहे .

**पंच कमिटी** प्रमोद चव्हाण, सतीश चव्हाण, जितेंद्र चव्हाण, सुधीर चव्हाण, हरिभाऊ समिद्रे, पवन शिरसागर, असद पैलवान, शुभम दळे संपूर्ण पंच कमिटी गावकरी व मित्र मंडळ चिकलठाण.



# सात पोलिस अधीक्षकांच्या बदल्या; निलोत्पल गडचिरोली तर परदेशी चंद्रपूरचे एसपी

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** गृह विभागाने बहुप्रतिक्षित २५ पोलिस अधीक्षक दर्जांच्या अधिकाऱ्यांच्या गुरुवारी बदल्या करीत विदर्भात मोठे फेरबदल केले. नागपुरातील वाहतूक शाखेचे उपायुक्त सारंग आव्हाड यांच्याकडे बुलढाणा अधीक्षकपदाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

राज्य गुप्तवार्ता विभागाचे उपायुक्त रवींद्रसिंग परदेशी यांची चंद्रपूर पोलिस अधीक्षकपदी नियुक्ती करण्यात आली. पोलिस अकादमीचे अधीक्षक गौरव सिंग हे यवतामळचे पोलिस अधीक्षक असतील. राज्य राखीव पोलिस दलाचे संदीप घुगे (गट क्रमांक ११ नवी मुंबई ) यांच्याकडे अकोला पोलिस अधीक्षक पदाचा कारभार सोपविण्यात आला आहे. लातूरचे अधीक्षक निखिल पिंगळे यांच्याकडे गोंदियाचा कारभार सोपविण्यात आला असून, नागपुरातील परिमंडळ चारचे उपायुक्त नुरुल हसन हे वर्धेचे पोलिस अधीक्षक असतील. मुंबईचे पोलिस उपायुक्त निलोत्पल यांची गडचिरोलीच्या पोलिस अधीक्षकपदी नियुक्ती करण्यात आली असून, गडचिरोलीचे अधीक्षक अंकित गोयल यांच्याकडे पुणे ग्रामीणचा तर नागपूर लोहमार्गाचे अधीक्षक एम.राजकुमार यांच्याकडे जळगाव पोलिस अधीक्षकपदाची जबाबदारी सोपविण्यात आली. विशाल सिंगुरी नागपूर ग्रामीणचे अधीक्षक राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांचे परिसहायक विशाल सिंगुरी यांच्याकडे नागपूर ग्रामीण अधीक्षकपदाची जबाबदारी सोपविण्यात आली. विजय मगर यांची अद्याप कुठेही नियुक्ती करण्यात आलेली नाही. सिंगुरी हे २०१४ तुकडीचे आयपीएस अधिकारी आहेत. ते इलेक्ट्रिक इंजिनीअर आहेत. नागपूर आयुक्तालयातील विशेष शाखेचे उपायुक्त बसवराज तेली यांची सांगली अधीक्षकपदी नियुक्त करण्यात आली. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे अधीक्षक राकेश ओला यांच्याकडे अहमदनगरचा कार्यभार सोपविण्यात आला. ठाण्याचे पोलिस उपायुक्त लक्ष्मीकांत पाटील हे नागपूर पोलिस प्रशिक्षण केंद्राचे प्राचार्य असतील.

# सौर कृषिपंप योजनेचा दुबार फायदा घेता येणार नाही : विकास रोडे

आधुनिक केसरी न्यूज



**औरंगाबाद :** अटल सौर कृषिपंप योजना-१ व २ आणि मुख्यमंत्री सौर कृषिपंप योजनेमध्ये लाभ घेतलेले शेतकरी महाकृषि ऊर्जा अभियन पीएम-कुसुम घटक-ब योजनेसाठी पात्र नाहीत. त्यामुळे त्यांनी महाकृषि ऊर्जा अभियन पीएम-कुसुम घटक-ब योजनेच्या पोर्टलवर ऑनलाईन अर्ज भरु नयेत. तरी सुद्धा अर्ज भरल्यास त्यांचा अर्ज रद्द करण्यात येईल. महाकृषि ऊर्जा अभियन पीएम-कुसुम घटक-ब योजनेअंतर्गत एका लाभार्थी शेतकऱ्याने एकाच सौर कृषिपंपाकरीता अर्ज सादर करावा. एकापेक्षा जास्त अर्ज सादर केल्यास इतर अर्ज रद्द करण्यात येईल, असे विभागीय महाव्यवस्थापक विकास रोडे सांगितले आहे. तसेच असे निदर्शनास आले आहे की उपरोक्त योजनेअंतर्गत सौर कृषिपंपाचा लाभ घेतलेले शेतकरी सौर कृषिपंप काढून ठेवतात व लाभ घेतला नसल्याचे भासवून दुसरा सौर कृषिपंप महाकृषि ऊर्जा अभियन पीएम-कुसुम घटक-ब योजनेअंतर्गत आस्थापित करुन घेतात. अशी बाब निदर्शनास आल्यास त्यांच्याकडील सौर कृषिपंप काढून घेण्यात येईल व त्यांनी भरलेली लाभार्थी हिस्सा रक्कम जप्त करण्यात येईल व अशा शेतकऱ्यांच्या विरुद्ध FIR करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.



# रश्मी शुक्ला यांनी केलेल्या अनधिकृत फोन टॅपिंगची चौकशी न्यायालयामार्फत व्हावी

## महेश तपासे : शिंदे सरकार नियोजनशून्य पध्दतीने कारभार करतेय

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** शिंदे - फडणवीस सरकारने रश्मी शुक्ला यांना अनधिकृत फोन टॅपिंगप्रकरणी क्लीनचीट देणे म्हणजे माफी देण्याचा प्रकार आहे त्यामुळे रश्मी शुक्ला यांनी केलेल्या अनधिकृत फोन टॅपिंगची चौकशी आता न्यायालयाच्या माध्यमातून व्हावी अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे राज्य मुख्य प्रवक्ते महेश तपासे यांनी केली आहे. महाविकास आघाडी सरकार आल्यानंतर आयपीएस अधिकारी रश्मी शुक्ला यांनी महाविकास आघाडी सरकारमधील नेत्याचे फोन अनधिकृतपणे टॅप केल्याचा प्रकार समोर आला होता. त्यानंतर रश्मी शुक्ला यांची कुलाबा पोलिसांच्यावतीने चौकशी सुरू करून साडेसातशे पानांचे



आरोपपत्र दाखल करण्यात आले होते असेही महेश तपासे म्हणाले.

शिवसेनेत आमदारांनी बंड केल्यानंतर महाविकास आघाडीचे सरकार पडले आणि शिंदे - फडणवीस सरकार सत्तेवर आले. म्हणजे ज्यांच्या आदेशाने फोन टॅपिंग सुरु होती तेच सरकार परत आल्यावर रश्मी शुक्ला यांची चौकशी थांबवण्याचा निर्णय झाला आहे परंतु या प्रकरणात न्यायालयाने चौकशी करावी, कोण दोषी आहे की नाही हे ठरवले पाहिजे, सरकारने नाही असेही महेश तपासे म्हणाले.

जनतेसाठी उपक्रम जाहीर करताना त्याची तरतूद करणे आणि तरतुदीसाठी नियोजनाची आवश्यकता असते मात्र शिंदे सरकार नियोजनशून्य पध्दतीने कारभार करतेय असा थेट आरोप महेश तपासे यांनी केला आहे.

शिंदे सरकारकडे योजनांबाबत आर्थिक किंवा लॉजिस्टीकदृष्टया नियोजन नाही. निव्वळ घोषणा करुन नागरिकांच्या पदरी निराशाच आली आहे. आता तर दिवाळीत 'आनंद शिधा' वाटप करणार असे जाहीर करुन लोकांना जर शिधा मिळत नसेल तर हे सरकारचे अपयश आहे असा हल्लाबोलही महेश तपासे यांनी केला.

आरोग्याकडे दुर्लक्ष करू नका
आरोग्य हीच संपत्ती आहे

शहरातील एक विश्वसनीय सुपर मार्केट
महावीर
घर संसार



- घाऊक आणि किरकोळ
- किराणा, सुका मेवा, मसाले
- क्रॉकरी, घरगुती उपकरणे
- घर साफ करणारे साहित्य, स्टील आणि ॲल्युमिनियम
- प्लास्टिकच्या वस्तू आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअप ऑर्डर आणि कोणतीही ऑर्डर 9850017181
वितरण स्थिती 9021395308 9657398232
घाऊक चौकशी 7620111118 9527111185

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.p. रोड, चेलीपुरा, शहागंज, औरंगाबाद
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर MIDC चिकलठाणा, औरंगाबाद



# शेकडो किलो कांदा गेला वाहून

## कष्टाने वाढवलेली पिके डोळ्यांदेखत पाण्याखाली

आधुनिक केसरी न्यूज

**अहमदनगर :** अतिवृष्टीमुळे राज्यभरात शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले असून मोठ्या कष्ट्याने वाढवलेली पिके डोळ्यांदेखत पाण्याखाली गेली आहेत. मात्र या पावसाचा फटका केवळ शेतकऱ्यांनाच बसला, असे नाही. कोपरगाव तालुक्यात याचा फटका व्यापाऱ्यांनाही बसला आहे. टाकळी रस्त्यालगत काही व्यापाऱ्यांनी शेतकऱ्यांचा खरेदी केलेला कांदा साठवून ठेवला होता. बुधवारी मध्यरात्री कोपरगाव तालुक्यात अतिवृष्टी झाली. त्यामुळे अचानक आलेल्या पाण्यामुळे या शेडमधील व्यापाऱ्यांचा कांदा पाण्यात वाहून गेला. परिणामी व्यापाऱ्यांचे मोठे नुकसान झाले.

टाकळी रोडवरील या व्यापाऱ्यांना दोन वर्षांपूर्वी झालेल्या अतिवृष्टीचाही तडाखा बसला होता. त्यावेळी मोठ्या प्रमाणात साठवलेला कांदा वाहून गेला होता. आता पुन्हा या कांदा व्यापाऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांकडून खरेदी केलेला कांदा वाहून गेला. तसंच सततच्या पाण्यामुळे साठवून ठेवलेला कांदा सडला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना कांद्याचे पैसे कसे द्यायचे, अशी चिंता आता या व्यापाऱ्यांना सतावत आहे. काहींनी स्वतःचे पैसे उपलब्ध करून शेतकऱ्यांना बिले दिली. मात्र त्यांचा कांदा वाहून गेल्याने तोटा झाला आहे. ऐन दिवाळीत आलेल्या या संकटामुळे व्यापाऱ्यांची कोंडी झाली आहे. पाण्याचा प्रवाह थांबल्यावर उरलेला कांदा पाण्यावर तरंगत होता. भिजलेला हा कांदा वाया गेल्याने व्यापाऱ्यांचे मोठे नुकसान झाले. यामुळे गुरूवारी कृषी उत्पन्न बाजार समितीमधील कांद्याचे लिलावही बंद ठेवण्यात आले होते. संजीवनी उद्योग समुहाचे अध्यक्ष बिपीनदादा कोल्हे यांनी गुरूवारी सकाळी या नुकसानीची पाहणी केली आणि सर्व कांदा व्यापाऱ्यांना धीर दिला. झालेल्या नुकसानीची पाहणी करून त्यांनी तहसीलदार विजय बोरूडे यांना पुढील कार्यवाहीच्या सूचना केल्या. कोल्हे म्हणाले, बुधवारी पहाटे मध्यरात्री विजांच्या कडकडाटासह पाऊस झाला. अतिवृष्टीमुळे मध्यरात्री आलेल्या पाण्यामुळे काहीच कळले नाही. नैसर्गिक संकट भयावह आहे. यापूर्वी एवढ्या मोठ्या प्रमाणात पाऊस कोसळला नाही. विजेचा कडकडाट प्रचंड होता. या व्यापाऱ्यांचे मोठे नुकसान झाले असून त्यांना धीर देऊन प्रशासकीय पातळीवर या संकटाचे गांभीर्य लक्षात आणून दिले आहे. संजीवनी आपत्ती व्यवस्थापन केंद्रामार्फत मदतकार्य सुरू आहे, असंही त्यांनी सांगितले.

# आंदोलनाची दखल घेण्यास विलंब; पालिका आयुक्तांवर फेकले गटारातील घाण पाणी

आधुनिक केसरी न्यूज

**मालेगाव :** रस्त्यावरील खड्डे व गटारातील सांडपाण्यामुळे त्रस्त झाल्याने आंदोलन करणाऱ्या 'एमआयएम'च्या कार्यकर्त्यांनी महापालिका आयुक्तांवर चक्क गटारातील पाणी व गरम चहा फेकण्याचा प्रकार गुरुवारी येथे घडला. पालिका प्रशासनाने आंदोलनाची दखल घेण्यास विलंब केल्यामुळे आंदोलकांनी हा पवित्रा घेतल्याचे सांगण्यात येते. शहरातील जुना आग्रारोडवरील देवीचा मळा परिसरात रस्त्याच्या दुतर्फा सुरु असलेल्या गटार कामामुळे संपूर्ण रस्त्यावर सांडपाणी साचत आहे. तसेच या रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर खड्डे झाले त्यामुळे वाहनधारक व नागरिक त्रस्त झाले आहेत. महापालिकेकडे वारंवार तक्रार करूनही या समस्यांकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप केला जात आहे. गुरुवारी दुपारी एमआयएमचे आमदार मौलाना मुफ्ती मोहम्मद ईस्माईल यांनी देवीचा मळा भागात आपल्या कार्यकर्त्यांसह अचानक रस्त्यावर ठिय्या मांडला. महापालिका आयुक्तांनी स्वतः आंदोलनस्थळी येऊन यासंदर्भात आश्वासन द्यावे असा आंदोलकांचा आग्रह होता. यावेळी कार्यकर्त्यांनी मोठ्या प्रमाणावर घोषणाबाजी सुरू केली. या आंदोलनामुळे वाहतूक कोंडी झाली. दरम्यान, आंदोलकांशी चर्चा करण्यासाठी आयुक्त भालचंद्र गोसावी हे आंदोलन स्थळी दाखल झाले. ते येताच काही कार्यकर्त्यांनी त्यांच्या अंगावर गरम चहा आणि गटारातील पाणी फेकल्याचा धक्कादायक प्रकार घडला.यामुळे गोंधळाची स्थिती निर्माण झाली. यावेळी पोलीस व महापालिकेतील अन्य अधिकाऱ्यांनी आंदोलकांची समजूत घालण्याचा प्रयत्न केला. आंदोलनामुळे बराचवेळ जुना राष्ट्रीय महामार्गावरील वाहतूक विस्कळित झाली होती. त्यामुळे येथील नवीन बसस्थानकातून सुटणाऱ्या आणि धुळे,चाळीसगावकडून या स्थानकात येणाऱ्या बसगाड्यांचा मार्ग बदलण्यात आला होता.

या रस्त्याच्या कामास प्रशासकीय मंजुरी मिळाली असून लवकरच हे काम पूर्णत्वास जाणार आहे . आंदोलकांना हीच वस्तुस्थिती समजावून सांगण्याचा प्रयत्न आपण करीत होतो . पण ते ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हते . त्यातूनच कुणीतरी आपल्या अंगावर गरम चहा व गटारातील पाणी फेकले .
**— भालचंद्र गोसावी, आयुक्त तथा प्रशासक, मालेगाव महानगरपालिका .**



# परराज्यातील मालाने पारंपरिक कुंभार बांधव अडचणीत

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** शहरात व सोयगाव तालुक्यातील सावळदबारा परिसरात नादांतांडा, देव्हारी, बनोटी, जरंडी, फर्दापूर, जामठी,घाणेगांव, सावळदबारासह ग्रामीण भागातील मातीची विविध भांडी तयार करणारा पारंपरिक कुंभार समाज हा परराज्यातून येणाऱ्या मालामुळे संकटात सापडला आहे. त्याला डोक्यावर किंवा मोटारसायकल वरुन माल विकवा लागत आहे तरी पण कोणी घ्यायला तयार नाहीत.या ठिकाणी तयार होणाऱ्या भांड्यांसाठी मेहनत जास्त करावी लागते अन् कमाईमात्र कमी होते. विविध भांडी होलसेल बाजारात नेऊन विक्री करणाऱ्या व्यापाऱ्यांची चांगलीच चांदी होत आहे. सोयगाव तालुक्यात सावळदबारा शंकर सुखदेव काळे कुंभार गावात कुंभारगल्लीत सध्या कुंभार समाजाची घरे आहेत. सध्या त्यांची चौथी पिढी मातीच्या विविध वस्तू बनवून विक्री करण्याचा पारंपरिक व्यवसाय करत आहे . या ठिकाणी घरासमोरच दिवाळीसाठी पणत्या, घोडे, लहान मटकी व इतर ऑर्डरनुसार भांडी बनविण्याचे काम जोमाने सुरू आहे. त्याशिवाय ही कुटुंबे विविध प्रकारचे माठ, रांजण, तांबे, सुरई, जेवणाची हंडी व हॉटेलपासून घरापर्यंत लागणाऱ्या चुली बनवितात. तसेच गणेशोत्सवात गणरायाच्या तर नवरात्रोत्सवात देवीच्या मूर्ती देखील तयार करतात.

या कामावरच कारागिरांच्या कुटुंबांचा उदरनिर्वाह चालतो. पूर्वी मातीपासून तयार होणाऱ्या विविध वस्तूंना मोठी मागणी होती. त्यामुळे कमाईदेखील बऱ्यापैकी होत होती. त्याबरोबरच होलसेल बाजारात आसपासच्या जिल्ह्यांतील व्यापारी मोठ्या प्रमाणावर माल नेत होते.



**परराज्यातील मालाचा फटका :**
परिसरात गेल्या काही वर्षांपासून परराज्यातील व्यापारी माल आणून विकतात . हा माल बिहार व इतर राज्यातून येतो . तेथील माती भांडी बनविण्यासाठी चांगली असल्याने ही भांडी लोकांचे लक्ष वेधून घेतात . त्यामुळे पारंपरिक कारागीर अडचणीत आले आहेत . त्यांच्या उत्पन्नातही मोठी घट झाली आहे . उलट जे व्यापारी पारंपरिक कारागिरांकडून तयार झालेला माल विकत घेतात त्यांना बाजारात त्या वस्तू विकून दुप्पट नफा मिळतो .पर राज्यातील मालाने आमच्या व्यवसायाला जणू खिळ बसवली आहे .कोरोनामुळे आधिच आमचा व्यवसाय ठप्प झालेला आहे . गणेशोत्सव, गौरी पूजन सह अन्य उत्सव फेल झाले आहे . दिवाळीतही काय होते या चिंतेने मन व्याकूळ होत आहे . **शंकर सुखदेव कुंभार काळे, सावळदबारा**

# अल्पसंख्याक महिलांसाठी बचत गटाची निर्मिती होणार

## शिंदे, फडणवीस सरकारचे भाजपाच्या महिला मोर्चा प्रदेशाध्यक्षा आ. उमा खापरे यांच्याकडून अभिनंदन

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** अल्पसंख्याक महिलांच्या आर्थिक विकासासाठी नवीन २ हजार बचत गटांची निर्मिती करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. त्याच बरोबर, 'माता सुरक्षित तर घर सुरक्षित' या विशेष मोहिमेत महिलांच्या आरोग्य तपासणीसाठी प्रत्येक जिल्ह्याला २ कोटी रु. निधी देण्याचा निर्णयही राज्य सरकारने घेतला आहे. महिलांच्या हिताचे निर्णय घेतल्याबद्दल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे भाजपाच्या महिला मोर्चा प्रदेशाध्यक्षा आ.उमा खापरे यांनी अभिनंदन केले आहे. महिलांच्या सक्षमीकरणाबरोबरच महिलांच्या आरोग्याकडेही राज्य सरकार लक्ष देत आहे, असेही आ. उमा खापरे यांनी प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे.



आ. उमा खापरे यांनी म्हटले आहे की, महिला आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून अल्पसंख्याक महिलांच्या आर्थिक विकासासाठी १५ जिल्ह्यांमध्ये नवीन २ हजार ८०० बचत गटांची निर्मिती करण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. त्यानुसार औरंगाबाद, अकोला, अमरावती, बुलढाणा, यवतमाळ, हिंगोली, जालना, उस्मानाबाद, लातूर, बीड, चंद्रपूर, वर्धा, भंडारा, गोंदीया, गडचिरोली या १५ जिल्ह्यांमध्ये सुमारे नवीन २८०० बचत गटांची निर्मिती महिला आर्थिक विकास महामंडळामार्फत करण्यात येणार आहे. नांदेड, कारंजा (जि. वाशिम), परभणी, औरंगाबाद, नागपूर या पाच शहरांमध्ये महिला आर्थिक विकास महामंडळामार्फत अल्पसंख्याक महिलांसाठी स्वयंसहाय्यता बचत गट सध्या स्थापन करण्यात आलेले आहेत.

माता सुरक्षित तर घर सुरक्षित मोहिमेत राज्यातील अंदाजे ४ कोटी महिलांची आरोग्य तपासणी व औषधोपचार करण्यात येणार आहे. या मध्ये १८ वर्षावरील महिला, माता, गरोदर स्त्रीया यांचा समावेश आहे. महिलांना शिबीराच्या ठिकाणी आणणे व घरी पोहचविणे आणि औषधांकरिता मिळून १ कोटी आणि शहरी आणि महापालिका क्षेत्रासाठी १ कोटी असे प्रत्येक जिल्ह्यासाठी २ कोटी रुपये निधी देण्याचा निर्णयही राज्य सरकारने घेतला आहे. या निर्णयामुळे महिलांचे आरोग्य राखण्यास मदत होणार आहे, असेही आ. उमा खापरे यांनी पत्रकात म्हटले आहे.



# मविआच्या नेत्यांना कारवाईची भीती होती

## सीबीआयला राज्यात मोकळीक दिल्याबद्दल चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले सरकारचे अभिनंदन

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** शिंदे फडणवीस सरकारने सीबीआयला राज्यात तपासाची सरसकट मोकळीक दिल्याबद्दल त्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अभिनंदन केले. ते म्हणाले की, आधीच्या महाविकास आघाडी सरकारच्या नेत्यांना आपल्या भ्रष्टाचारावर कारवाईची भीती वाटत होती व त्यामुळे त्यांनी राज्यात सीबीआयला मनाई केली होती, अशी टीका चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली.



ज्येष्ठ काँग्रेस नेते आणि देशाचे माजी गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर यांनी गीतेतील श्रीकृष्णाचा अर्जुनाला संदेश म्हणजे जिहाद असल्याचे केलेले वक्तव्य अत्यंत दुःखदायक असून हिंदू समाज आणि देश कधीही हे विधान सहन करणार नाही. त्यांनी देशाची आणि हिंदू धर्मियांची माफी मागितली पाहिजे, अशी मागणी भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी शुक्रवारी मुंबईत भाजपा प्रदेश कार्यालयात पत्रकारांशी बोलताना केली. ते म्हणाले की, शिवराज पाटील चाकूरकर यांच्या या विधानामुळे त्यांच्याविषयीचा आदर संपला आहे. त्यांनी लोकसभा अध्यक्ष आणि देशाचे गृहमंत्री अशा मोठ्या पदांवर काम केले. त्या पदांचाही त्यांनी अपमान केला आहे. त्यांनी केलेले विधान हिंदू संस्कृती आणि भारताचा अपमान करणारे आहे. हे विधान हिंदू समाज आणि देश कधीही सहन करणार नाही. शिवराज पाटील यांना माफी मागावी लागेल. त्यांनी सांगितले की, अंधेरी पूर्व विधानसभा पोटनिवडणुकीत दिवंगत आमदार रमेश लटके यांच्या पत्नी ऋतुजा यांना बिनविरोध निवडून द्यावे असे आवाहन महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी लेखी पत्राद्वारे केले. त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी पत्रकार परिषदेत जाहीरपणे तसे आवाहन केले. त्याचा विचार करून भाजपाने सहानुभूती म्हणून आपला उमेदवार मागे घेतला. भाजपाने उमेदवार मागे घेईपर्यंत शरद पवार यांच्या आवाहनाचे समर्थन करणाऱ्या उद्धव ठाकरे यांनी नंतर मात्र पळ काढला अशी भाषा सुरू केली. आपले त्यांना आव्हान आहे की, २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत याच मतदारसंघात भाजपा आणि बाळासाहेबांची शिवसेना युतीचा उमेदवार लढेल आणि उद्धव ठाकरे यांच्या उमेदवाराला पळ काढावा लागेल. भाजपा आणि बाळासाहेबांची शिवसेना युती सरकारने दिवाळीसाठी रेशनवर शंभर रुपयात चार वस्तूंचे पॅकेज अवघ्या देण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार या पॅकेजचे वाटप सुरू झाले आहे. आपण स्वतः पुणे जिल्ह्यात काल काही लाभार्थ्यांना पॅकेज दिली. सहा कोटी लोकांपर्यंत ही किट पोहोचवायची असल्याने काम मोठे आहे व त्यामुळे स्वाभाविकपणे काही अडचणी येत आहेत. परंतु वाटप सुरू झाले आहे व ते पूर्ण होईल, हे महत्त्वाचे आहे, असे त्यांनी सांगितले. आपल्या राज्यातील प्रवासात ठिकठिकाणी काँग्रेस – राष्ट्रवादी काँग्रेसचे चांगले कार्यकर्ते पंतप्रधान नरेंद्र मोदी व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेऊन भाजपामध्ये प्रवेश करत आहेत. त्यामुळे आपल्याविरोधात काँग्रेस – राष्ट्रवादी काँग्रेसने सुरू केलेले आंदोलन स्वाभाविक आहे, असा टोला त्यांनी हाणला.

# पैठण येथे काकडा मोठ्या उत्साहात सुरूवात

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** येथील भव्य दिव्य मंदिर उभारलेल्या संत तुकाराम महाराज मंदिरात दि. 9-10-22 पासुन काकडा सकाळी ५ ते ७ या वेळेत मोठ्या उत्साहात वाणी भूषण ह.भ.प. गजानन महाराज नलावडे यांच्या मार्गदर्शनाखाली चालू आहे. या ठिकाणी महाराष्ट्रातील नामांकित भजन सम्राट रामेश्वर महाराज सुपेकर उपस्थित रहात आहेत. त्यांना ऐकण्यासाठी मोठ्या संख्येने भावीक भक्त उपस्थित रहात आहेत. तसेच आतापर्यंत महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध किर्तनकार ह.भ.प. दिपक उगले महाराज, ह.भ.प. शरद फासाटे महाराज, ह.भ.प. खिंडकर महाराज, ह.भ.प. सोमनाथ कराळे महाराज ह.भ.प. रामेश्वर म्हस्के महाराज, ह.भ.प. श्रीकांत महाराज बालानगरकर ह.भ.प. संतोष गारुळे महाराज ह.भ.प. बुधवंत महाराज हे ही उपस्थित



राहतात. या सर्वांमुळे काकड्याला भरभरून प्रतिसाद मिळत असून परिसरात भक्तीमय वातावरण निर्माण झाले आहे. तसेच काकडा संपल्यानंतर रोज सकाळी नाश्त्याची व्यवस्था भाविकांकडून केली जात आहे. यासाठी नगरसेवक तुषार पाटील व कृष्णा भाऊ मापारी यांचे सहकार्य मिळत आहे. तसेच या काकड्यासाठी जगद्गुरु तुकाराम महाराज वारकरी सेवा मंडळाचे सदस्य परिश्रम घेत आहेत. तरी परिसरातील भाविकांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन करण्यात येत आहे.

# रेल्वेच्या धडकेत वाघिणीचा मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** दक्षिण मध्य रेल्वेच्या दिल्ली ते चेन्नई रेल्वे मार्गावर राजुरापासून आठ किलोमीटर अंतरावरील चनाखा गावाशेजारी रेल्वेने धडक दिल्याने एका वाघिणीचा मृत्यू झाला. ही घटना रात्री घडली असावी, असा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. माहिती मिळताच उपवनसंरक्षक श्वेता बोड्डू , उपविभागीय वनाधिकारी अमोल गर्कल, वनपरिक्षेत्र अधिकारी सुरेश येलकेवाड यांनी घटनास्थळी भेट दिली. राजुरा वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालयांतर्गत येणाऱ्या चुनाळा वनक्षेत्र परिसरातून रेल्वे मार्ग गेला आहे. आज सकाळी रेल्वे गँगमन गस्त घालीत असताना त्याला रेल्वे रुळाशेजारी वाघीण मृत्युमुखी पडल्याचे दिसून आले. त्यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांना माहिती दिली. रेल्वे विभागाने राजुरा वन विभागाला कळविले. यानंतर वनपरिक्षेत्र अधिकारी सुरेश येलकेवाड आणि क्षेत्र सहायक प्रकाश मत्ते यांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा केला.

# आपेगाव सरपंचपदी पांडुरंग औटे तर उपसरपंचपदी सोमनाथ औटे बिनविरोध

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** तालुक्यातील आपेगाव ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी पांडुरंग कल्याण औटे तर उपसरपंचपदी सोमनाथ रावसाहेब औटे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. निवड जाहीर होताच समर्थकांनी फटाके व गुलाल उधळत आपला आनंद साजरा केला. गुरुवारी ग्रामपंचायत कार्यालय आपेगाव येथे सरपंच,उपसरपंच पदासाठी निवडणूक घेण्यात आली.यावेळी सरपंच पदासाठी पांडुरंग औटे व उपसरपंच पदासाठी एकमेव उमेदवारी अर्ज आल्याने निवडणूक निर्णय अधिकारी बी.आर. खेडकर मंडळ अधिकारी यांनी पांडुरंग औटे,व सोमनाथ औटे यांची बिनविरोध निवड जाहीर केली. यावेळी ग्रामसेवक, बी.एल. साळवे यांनी काम पाहीले, सरपंच, उपसरपंच, सदस्य व गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सरपंच पदी निवड जाहीर झाल्यानंतर गावकऱ्यांनी नवनिर्वाचित सरपंच उपसरपंच तथा सदस्याचे अभिनंदन केले. आपेगावचे नवनिर्वाचित सदस्य वसिम गफ्फार शेख, वैजिनाथ लक्ष्मण औटे, केसरबाई बनाजी औटे, वैशाली पांडुरंग औटे, सुवर्णा राजेंद्र औटे, शोभाबाई आबासाहेब औटे, राधाबाई भगवान कोल्हे यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. गावकऱ्यांनी आपल्यावर दाखविलेल्या विश्वासाला कधीही तडा जाऊ न देता गावच्या विकासासाठी सदैव प्रयत्न करेन अशी प्रतिक्रिया नवनिर्वाचित सरपंच पांडुरंग औटे यांनी दिली आहे. यावेळी शिवाजी बँकेचे संचालक भाऊसाहेब औटे, स्वभिमानी शेतकरी संघटनेचे युवा जिल्हाध्यक्ष माऊली मुळे, तंटामुक्तीचे अध्यक्ष गफ्फार पटेल यांनी नवनिर्वाचित सरपंच, उपसरपंच व सर्व सदस्यांचा सत्कार करून शुभेच्छा दिल्या.



# भाषा : विवाद नको संवाद हवा



श्रीनिवास भोंग
संपर्क क्र. 9423783235

आधुनिक केसरी

**जर दोन पक्षांना दोन भिन्न राज्यांमध्ये राज्य पक्ष म्हणून ओळखले जाते, तर त्यांना समान निवडणूक चिन्ह असू शकते. प्रत्येक राज्य पक्षाला त्या त्या राज्यांमध्ये किंवा राज्यांमध्ये त्या त्या वापरासाठी राखीव असलेल्या चिन्हाचे वाटप केले जाते. याचा अर्थ एकाच राज्यात राज्य पक्ष म्हणून मान्यता असलेल्या दोन पक्षांना समान चिन्ह असू शकत नाही.**

एकीकडे मेडिकलची पुस्तके हिंदी भाषेत प्रकाशित होत असताना तामिळनाडू सरकारने राष्टीय स्तरावरील नीट परीक्षेला विरोध केलेला आहे.दुसरीकडे तामिळनाडू सरकारचा हिंदीला विरोध कायमच आहे. गम्मत म्हणजे रजनीकांत, कमल हसन हिंदी सिनेमात काम करतात. ऐश्वर्या रायला घेऊन रोबो सिनेमा दोन्ही भाषेत काढला जातो. पण एरवी डीएमके पक्ष हिंदीला विरोध करतो. भारतातील भाषाविवादाचीमुळे १९६७ या वर्षामध्ये आहेत. १९६७ पर्यंत देशभरात काँग्रेस मजबूत होती. तामिळनाडूमध्येही काँग्रेसचेच सरकार होते. के कामराज तामिळनाडूचे मुख्यमंत्री होते. देशाच्या सर्व भागात काँग्रेस मजबूत होती तोवर फुटीरतावाद नव्हता. पण सीमावर्ती राज्यात संकुचित आधारावर प्रादेशिक पक्षांनी स्वायत्ततेच्या मागण्या पुढे रेटल्या. भाषिक मुद्दे पुढे केले. त्यांतून भाषिक विवाद निर्माण झाले. वास्तविक भारतातच नव्हे तर भारताशेजारील देशांमध्ये भाषिक विविधता आहे. ती आपण स्वीकारली पाहिजे. बांगलादेशमध्ये बंगाली, श्रीलंकेमध्ये तमिळ, पाकिस्तानमध्ये पंजाबी, सिंधी, मोरीशसमध्ये मराठी, नेपाळमध्ये नेपाळी भाषा बोलल्या जातात. शेजारील देशातील या सर्व भाषा भारततही बोलल्या जातात. इंग्रजी ही आपली मातृभाषा नाही. ती आपली नैसर्गिक भाषा नाही . कोणत्याच भाषेला विरोध करण्याचे कारण नाही. माजी पंतप्रधान नरसिह राव यांना चौदा भाषा येत असत . आपल्या सगळ्यांनाच मराठी, हिंदी समजते, बोलता येते .शेजारी कोणी मारवाडी, गुजराती बसले असले तर ते काय बोलतात याचा साधारण अंदाज येतो. एवढेच काय सरावाने बंगाली, उडिया,आसामी सुद्धा कानावर पडली तर गोड वाटते. भोजपुरी आणि साउथचे सिनेमे तरुण आवडीने पाहतो. माझे शिक्षण ज्या श्री मार्कंडेय विद्यालयात त्या शाळेतील पद्मशाली विद्यार्थी आपसात तेलगु बोलत असत. एरवी आम्ही मराठी बोलत असू .मैत्री घट्ट आहे. दहावीला असताना दिल्लीला गेलो होतो. आमचे मराठी ऐकून एक जवान पुढे आला .स्वतःहून मराठी बोलला. त्यामुळे भाषा हे बंधन नाही. ते जोडणारे साधन आहे. एकापेक्षा जास्त भाषा आल्या तर चांगलेच. हे लक्षात ठेवून आपण तरुणांनी वाटचाल करूया.

